अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## आज दहावी परीक्षेचा निकाल

सोलापूर : दहावीच्या निकालाची धाकधूक असणाऱ्या सर्व विद्यार्थी पालकांसाठी उद्याचा दिवस महत्वाचा असणार आहे. महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या दहवीच्या परीक्षेचा निकाल उद्या, म्हणजेच २ जून २०२३ रोजी जाहीर करण्यात येणार आहे. उद्या दुपारी एक वाजता हा निकाल बोर्डाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पाहता येणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणारी दहावीची लेखी परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होत आहे. यंदा २३ हजार १० शाळांमधील १५ लाख ७७ हजार २५६ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे.

कुठे पाहणार निकाल दहावीचा निकाल?

- www.mahahsscboard.in
- http://mahresult.nic.in
- https://ssc.mahresults.org.in
- http://sscresult.mkcl.org



www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २४३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# वर्षभरात चार कोटींचा गुटखा जप्त, खुलेआम विक्रीला लागेना लगाम

## १० रुपयाला ओला-सुका मावा तर २५ रुपयाला सुका मावा : टपरीवाले होताहेत मालामाल

सुराज्य/दीपक शेळके

**सोलापूर शहर-जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या विविध कारवाईत वर्षभरात जवळपास ४ कोटी कोटींचा गुटखा जप्त केला आहे. ६२ गुन्हे दाखल करून २७ खटले चालवण्यात आले तरी जिल्ह्यात खुलेआम गुटखा विक्री सुरुच आहे. याला लगाम मात्र लागत नसल्याचे दिसून येत आहे.**

सोलापूर शहर जिल्ह्यात बंदी घालण्यात आलेला गुटखा, पानमसाला, सुगंधी सुपारी, तंबाखू, स्विट सुपारीची मोठ्या प्रमाणात विक्री चालू आहे. शेजारील राज्यातून मोठ्या प्रमाणात या बंदी घालण्यात आलेल्या गुटख्याची तस्करी करून येण्याचे प्रमाण वाढले आहे. पोलीस प्रशासन आणि अन्न औषध प्रशासनाच्या वतीने संयुक्त मोहीम घेऊन बेकायदा विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने एक एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या वर्षात बेकायदा गुटखा विक्री करणाऱ्या ७१ ठिकाणी धाडी घालत कारवाई केली. यामध्ये ३ कोटी ७८ लाख ४० हजाराचा गुटखा जप्त केला आहे. यामध्ये ६२ गुन्हे दाखल केले आहे. २७ वाहने जप्त केली आहेत. २८ दुकाने सील केले आहेत तर २७ जणांवर खटले दाखल केले आहेत. तसेच शहरात प्रमाणात ओला आणि सुका मावाची विक्री केली जाते. यासंदर्भात तक्रारी आल्यानंतर शहर जिल्ह्यामध्ये विशेष मोहीम घेण्यात आली. शहरातील विजापूर नाका, सदर बझार पोलीस स्टेशन आणि सलगर वस्ती पोलीस स्टेशन अंतर्गत ३ एप्रिल रोजी मोहीम घेण्यात आली. या मोहिमेमध्ये मोठ्या प्रमाणात बंदी घालण्यात आलेला गुटखा मावा आढळून आल्याने २७ जणांवर कारवाई करत पान दुकाने सील केली आहेत. त्यानंतर २२ मे रोजी घेण्यात आलेल्या मोहिमेत चार पान टपरीवर कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत तर ग्रामीण भागात मंगळवेढा गावात मोठी मोहीम घेऊन माव्याचे चार हजार किंमतीची ११० माव्याचे पॅकेट आणि एक मोटार सायकल जप्त केली आहे.




### गुटखा कर्नाटक राज्यातून येतो

बंदी घालण्यात आलेला गुटखा पान दुकानांमध्ये खुलेआम विक्री चालू आहे. या गुटखा शेजारील कर्नाटक राज्यातून येत असल्याची माहिती आहे. त्याशिवाय सोलापूर शहर जिल्ह्यामध्ये यांची तस्करी करणारे काही ठराविक लोक आहेत. यांची माहिती असताना देखील खुलेआम विक्रीला का लागाम घातला जात नाही, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.

### सर्वात मोठी कारवाई

सर्वात मोठी कारवाई सोलापूर तालुका पोलीस स्टेशनच्या माध्यमातून करण्यात आली. तब्बल २ कोटींचा बंदी घालण्यात आलेला गुटखा घेऊन जाणारी गाडी ग्रामीण पोलीस दलामध्ये प्रशिक्षणासाठी आलेले आयएपीस अधिकारी कार्तिक यांनी ही धाडसी कारवाई केली होती. सदरचा गुटखा जप्त करून अन्न व औषध विभागास यांची विल्हेवाट लावण्यासाठी दिला होता.

### अशी लावली जाते विल्हेवाट

जप्त करण्यात आलेला गुटखा तत्काळ नष्ट केला जातो. शहराबाहेरील एका ऑईल मिलच्या बॉयलरमध्ये हा गुटखा जाळून नष्ट केला जातो. याचा रितसर पंचनामा केला जातो. त्यानंतर कंपनीचे व्यवस्थापक, पंच, साक्षीदार पोलिसाच्या समवेत व्हिडीओ चित्रिकरण केले जाते.

### दोन परिमंडल, दोन अधिकारी

सोलापूर जिल्ह्याचे दोन परिमंडल आहेत. प्रदीप राऊत आणि सुनील जिंतूरकर असे दोन सहाय्यक आयुक्त आहेत. राऊत यांच्याकडे सोलापूर शहर, बार्शी, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट असे विभाग येतात तर जिंतूरकर यांच्याकडे करमाळा, माढा, पंढरपूर, माळशिरस, मोहोळ, उत्तर सोलापूर असे विभाग येतात

### चार पदे रिक्त, एकाचे निलंबन

या विभागासाठी ९ पदे मंजूर आहेत. सध्या ६ अन्न सुरक्षा अधिकारी आहेत. त्यामध्ये दोन पुरूष तर चार महिला अधिकारी आहेत. चार पदे रिक्त आहे. तर एका अन्न व सुरक्षा अधिकाऱ्यांचा गुटखा तस्करीमध्ये हात असल्याने गुन्हा दाखल झाला होता. त्याला निलंबित केले आहे.

---

## सोलापूर जिल्ह्यात दोन दिवस उष्णतेच्या लाटेची शक्यता

### दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर आणि जिल्हावासियांची उन्हाच्या चटक्याने होरपळ होते आहे. गेल्या तीन दिवसांपासून पारा ४२ अंशाच्या पुढे आहे. बुधवारचे तापमान गुरूवारी देखील (४२.२) स्थिर होते.

वाढत्या तापमानाची चिंता असतानाच पुढील दोन दिवस सोलापुरात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, कुलाबा, मुंबईच्या अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यातील काही भागात २ व ३ जून रोजी उष्णतेच्या लाटेसम स्थिती निर्माण होणार असल्याची शक्यता वर्तवली आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, कुलाबा मुंबई या संस्थेने ही शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे गरजेशिवाय उन्हात जास्त फिरू नये, उन्हाच्या झळांपासून संरक्षण करण्यासाठी पुरेशी तयारी करूनच घराबाहेर पडावे. डोक्यावर टोपी घालावी किंवा सुती कापड गुंडाळावे. सोबत पाणी, लिंबू पाणी किंवा ओआरएस ठेवावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अधिकारी शक्तिसागर ढोले यांनी केले आहे.



## बार्शी-कुर्डुवाडी रोडवर ट्रक उलटला खांडवीजवळ दुचाकीस धडक; दोघे जखमी

सुराज्य/बार्शी

बार्शी कुर्डूवाडी रोडवरील खांडवी गावाजवळ दुचाकिस्वारास एम.एच २५ यु १३३७क्रमांकाच्या ट्रकने पाठीमागून धडक दिली. त्यात दोघेजण जखमी झाले. ट्रकही रस्त्याच्या कडेला उलटला.

अपघाताची घटना ही दुपारी २ च्या सुमारास खांडवी गावाजवळील सोजर फार्मसी कॉलेजजवळ होऊन यात राजकुमार जनार्धन क्षीरसागर (वय ४०) व जगन्नाथ दत्तात्रय क्षीरसागर (वय ६२) हे दोघे जखमी होऊन त्यांना उपचारास येथील जगदाळे मामा हॉस्पिटल मध्ये दाखल केले आहे.

जखमी दोघे हे मुलगा व वडील आहेत. ते बार्शीहून खांडवी गावाकडे जात होते. त्याच वेळी मागून बारीक वाळू भरणारा रिकाम्या ट्रकने दुचाकिस जबर धडक दिली. धडक मारून ट्रक पुढे जात असताना समोरून एक कार येत असताना तिला साईड देताना ट्रकही उलटला. त्यात चालक ही जखमी झाला आहे. याचा पुढील तपास तालुका पोलीस बोनंदर करत आहेत.

## वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे शहराला एक दिवस उशिरा पाणीपुरवठा

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सोलापूर विभागाकडून १३२ के.व्ही/३३ के.व्ही मंद्रुप सबस्टेशनहून टाकळी हेड वर्क्सला ३३ के.व्ही उच्चदाब विद्युत पुरवठा अचानक बुधवारी खंडीत झाल्याने टाकळी वरुन पाण्याचा उपसा कमी झाला आहे.

उजनी हेड वर्क्सला इंदापूरहून येणारे विद्युत पुरवठ्यामध्ये अनियमितता व कमी दाबाने झाल्यामुळे ३१ मे व दि.१ जून रोजी पूर्ण क्षमतेने पाण्याचा उपसा होऊ शकला नाही. त्यामुळे शहराला पाणीपुरवठा एक दिवस उशिरा होणार आहे. टाकळी हेड वर्क्स व उजनी हेड वर्क्स येथून होणारा २ जून रोजीचा नियोजीत पाणी पुरवठा एक रोटेशन पुढे जाणार आहे, तरी कृपया नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## महावीर चौकात मध्यरात्री दुभाजकाला धडकून तरुणाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

मध्यरात्रीच्या सुमारास होटगी रोडवरील भगवान महावीर चौकातील रस्त्याच्या दुभाजकाला धडकून एका २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला.



सुरज पवार (वय-२१, रा.पूनम नगर, जुळे सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. गुरूवारी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास मृत सुरज हा दुचाकीवरून जात असताना भगवान महावीर चौकातील दुभाजकाला धडकला.यात त्याच्या डोक्याला,तोंडाला गंभीर मार लागून तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी लगेच उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.




माजी आमदार नरसय्या आडम यांचे संघर्षाची मशाल हाती या आत्मचरित्राचे प्रकाशन माकपाचे महासचिव कॉ. सीताराम येचुरी आणि पॉलिट ब्यूरो मेंबर अशोक ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आडम मास्तर, डॉक्टर उदय नारकर, युसुफ शेख व इतर. (सविस्तर वृत्त पान ८ वर)

## बँगेहळ्ळी येथे चाकूने भोसकून खून

सुराज्य/सोलापूर

बँगेहळ्ळी (ता.अक्कलकोट) येथील बँगेहळ्ळी ते हंजगी रोडवर मागील भांडणाचा राग मनात धरून ५५ वर्षीय इसमाचा चाकूने भोसकून खून करण्यात आला.

राम महादेव माशाळे (वय ५५ रा.बॅगेहळ्ळी ता. अक्कलकोट) असे खून झालेल्या इसमाचे नांव आहे. ३१ मे रोजी सायंकाळी साडेसहा वा.च्या सुमारास बॅगेहळ्ळी ते हंजगी रोडवर आनंद जाधव यांच्या शेताजवळ बॅगेहळ्ळी येथे घडला. अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन मध्ये आरोपी नागेश अभिमान माशाळे यांच्या वर खुनाचा गुन्हा दाखल झाला. फिर्याद मयताचा मुलगा श्रीधर राम माशाळे (वय २३) यांनी दिली. दि. ३१ मे रोजी सायंकाळी ६:३० वा च्या सुमारास बॅगेहळ्ळी ते हंजगी रोडवर आनंद जाधव यांच्या शेताजवळ नागेश अभिमान माशाळे याने मागील भांडणाचा राग मनात धरून राम माशाळे यांच्या डोक्यात पाठीमागील बाजूस मोठ्या चाकूने दोन ते तीन वेळा तसेच चेहऱ्यावर भोसकून ठार मारले. अधिक तपास अधिकारी पोसई आर.एस. काळे हे करीत आहेत. घटनास्थळाला उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर अमोल भारती यांनी भेट दिली. आरोपीचे मोबाईल लोकेशन काढण्याचे काम सुरू आहे.

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपल्या छत्रीचा पावसाळ्यापेक्षा उन्हाळ्यातच जास्त उपयोग होतो!

| कल्याण |
|---|
| 459-86-240 |

| मेन बाजार |
|---|
| 180-98-116 |

# आषाढी वारीसाठी शासन ‘अलर्ट’

## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांनी घेतला आषाढी पूर्व तयारीचा आढावा

- वारीसाठी टोल माफ
- रस्त्यांच्या दुरूस्तीची सूचना
- पंढरपूर आणि पालखी मार्गावरच्या
- ग्रामपंचायतींना दुप्पट निधीची तरतूद

सुराज्य/मुंबई

पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी चोख नियोजन करण्यात यावे. यंदा वारीसाठी अधिक गर्दी होऊ शकते. त्यामुळे वारकरी बांधवांना कोणतीही अडचण येऊ नये, याची काळजी घ्या, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी मुंबई येथे दिले. वारीसाठी येणाऱ्या वाहनांना परतीच्या प्रवासासह टोल माफ करण्यात येईल, अशी घोषणाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. पंढरीत दर्शनासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना वेळेत दर्शन व्हावे, यासाठी विशेष सुविधा करण्यात यावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पंढरीच्या आषाढीच्या वारीच्या अनुषंगाने तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. बैठकीत पुणे विभागीय आयुक्त राव यांनी पालखी मार्ग तसेच वारीच्या दृष्टीने करण्यात आलेल्या तयारीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. यावर्षी वारीकरिता ६० टक्क्यांनी अधिकचे मनुष्यबळ तसेच पाण्याकरिता टँकर्सची संख्याही दुप्पट करण्यात येत असल्याची माहिती राव यांनी दिली. पंढरपूर आषाढी वारीसाठी निधीची कोणतीही कमतरता नाही. अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे नगरपालिकेसाठीच्या निधीत पाच वरून दहा कोटींची आणि ग्रामपंचायतींकरिता पंचवीस वरून पन्नास लाख रुपयांची अशी दुप्पट तरतूद केली आहे,असे मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वारी मार्गावरील पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना देण्यात येणारा निधी दुप्पट केला आहे, पंढरपूर आणि परिसरातील रस्ते वारीसाठी सुस्थितीत व्हावेत यासाठी १० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या निधीतून होणारी कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत यासाठी मंत्रालयीन स्तरावरील नगर विकास विभागाच्या उपसचिवांनी प्रत्यक्ष पंढरपूर आणि क्षेत्रीयस्तरावर पोहचून देखरेख व संनियत्रण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.



### ‘जी २०’ चे प्रतिनिधी म्हणणार विठ्ठल... विठ्ठल...!

पंढरीच्या श्री विठ्ठल-रखुमाईच्या चरणी माथा टेकवण्यासाठी वारकरी आसुसलेले असतात. त्या आषाढी वारी म्हणजे लाखो वारकऱ्यांचा मेजवानीच. या वारीत सारे पंढरपूर भक्तीरसात डुबून जाते. वारकऱ्यांचा हा विठुराया दिसतो कसा वारी कशी असते, हे पाहणे म्हणजे देवदुर्लभ लाभच. असाच लाभ घेणार आहेत, ‘जी २०’ चे प्रतिनिधी मंडळ. आषाढी वारीत त्यांच्या मुखी ‘विठ्ठल... विठ्ठल...’ गजर घुमणार आहे. हे प्रतिनिधी मंडळ वारी आणि त्या अनुषंगाने या संस्कृतीची ओळख करुन घेण्यात आहेत. यासाठी प्रशासनास योग्य पध्दतीने नियोजन करण्याचे आदेश, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

### टोल माफ-विशेष व्यवस्थेची सूचना

पालखी मार्गासह वारीत येणाऱ्या वाहनांना टोल माफ करण्याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी विशेष व्यवस्था करण्याचे निर्देशही संबंधित जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना दिले. ते म्हणाले की, वारीत सहभागी होणाऱ्या वाहनांना टोल द्यावा लागू नये यासाठी पोलीस विभागाने स्टीकर्स किंवा पासेसच्या माध्यमतून कार्यवाही करावी.

# दुधाचे राजकारण...

आपल्या देशात शेती क्षेत्राशी निगडित असणाऱ्या पिकांवर आणि शेतीपूरक उद्योगांवर राजकारण होत आहे. त्यामुळे पावसावर विसंबून राहणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारांच्या निर्णयांवर आशा ठेवावी लागत आहे. राजकारणी लोक आजही शेती क्षेत्रात खोलवर डोकावून पाहायला तयार नाहीत. आज महाराष्ट्रात दुधाच्या दराविषयी आंदोलने सुरू आहेत. त्यामुळे दूध व्यवसायावर चर्चा झडणे स्वाभाविकच आहे. दूध उत्पादनात भारत जगात पुढे पण, महाराष्ट्र मागे असल्याचा अनुमान यानिमित्ताने समोर आला आहे. श्वेतक्रांतीनंतर भारतात दूध उत्पादनात प्रचंड वाढ होत गेली. सहकारी संस्थांच्या जाळ्यामुळे शेतकऱ्यांनाही लाभ मिळाला. पण ज्या सहकार चळवळीत महाराष्ट्र अग्रेसर आहे, त्याच महाराष्ट्रातील सहकारी दूध संस्था नफ्यात येऊ शकल्या नाहीत. पूर्वीचे सत्ताधीश आणि आत्ताचे यांच्याकडून या प्रश्नाचे उत्तर मिळेल काय? डॉ. वर्गीज कुरियन यांनी १९७० मध्ये 'ऑपरेशन फ्लड' ही योजना राबवून अमूलच्या माध्यमातून दूध उत्पादनाबाबत श्वेतक्रांती घडवून आणल्याची नोंद आहे. त्यानंतर सर्वच राज्यांमध्ये सहकारी दूध संघ जोमाने काम करू लागले. देशात आजच्या घडीला विक्रमी दूध उत्पादन केले जात आहे. भारत हा जगातील सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश आहे. देशात विक्रमी दूध उत्पादन होत असले तरी महाराष्ट्र मात्र पहिल्या पाच राज्यांत मोडत नाही. एके काळी दूध उत्पादनात अग्रेसर असलेला महाराष्ट्र कालांतराने मागे पडला. महाराष्ट्रातील दूध व्यवसायाने मोठी प्रगती केली असली तरी अनेक अडचणीही उभ्या आहेत. दुधाची किंमत हा घटक उल्लेखनीय ठरत आहे.



गेल्या पंधरा वर्षांत दुधाची किंमत तिपटीपेक्षा जास्त झाल्याचे निदर्शनास येते. तरीही शेतकऱ्यांना हा पूरक व्यवसाय करणे जिकिरीचे बनले आहे. उत्पादनातील ७० टक्के भाग जनावराच्या चाऱ्यावर खर्ची पडतो. आपल्या राज्यात साध्या चाऱ्याचीही आज टंचाई आहे, ही बाब सरकारही मान्य करते. पौष्टिक पशुखाद्याचा दर खूप जास्त असल्यामुळे सर्वसाधारण दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या ते आवाक्यापलीकडील ठरतात. राज्यातील दूध देणारी गुरे कुपोषित आहेत. कुपोषणाचे निराकरण केल्याशिवाय कमी खर्चात दुधाचे वाढीव उत्पादन मिळू शकणार नाही, या वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कर्नाटकमधील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात 'अमूल विरुद्ध नंदिनी' हा वाद रंगला. ज्याचा फटका काही अंशी विद्यमान भाजपा सरकारला बसल्याचे बोलले जाते. अमूल ही गुजरातमधील संस्था कर्नाटकमध्ये दूध संकलन आणि विक्री करण्यासाठी उतरणार असल्याची बातमी पसरल्यामुळे राज्याचा नंदिनी उत्पादन संघ धास्तावला. त्यात राहुल गांधी यांनी नंदिनीच्या केंद्राला भेट देऊन तेथील आईसक्रिम चाखला आणि नंदिनीला पाठिंबा दर्शविला. या प्रतीकात्मक कृतीमुळे काँग्रेसने कर्नाटकची प्रादेशिक अस्मिता कुरवाळली. तिकडे तामिळनाडू राज्यातदेखील मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी अमूलला विरोध दर्शविला आहे.आविन हा आमचा सर्वोच्च सहकारी विपणन महासंघ असून त्याच्या दूध उत्पादन क्षेत्रातून अमूलने दूध खरेदी करणे हे अतिक्रमण आहे. त्यामुळे अमूलला तामिळनाडूतून दुधाची खरेदी करण्यापासून त्वरित रोखावे, असे स्टॅलिन यांनी शहा यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले. गुजरातच्या अमूलला विरोध करण्यासाठी दक्षिणेतील कर्नाटक आणि तामिळनाडू राज्य एकवटल्याचे पाहायला मिळाले. राजकारण किती खालच्या पातळीवर गेले आहे हे यातून दिसून येते. सहकार तत्त्व हे महाराष्ट्रात रुजले आणि वाढले, पण त्याला राजकीय ग्रहण लागले आणि महाराष्ट्रात दूध व्यवसायात सहकारी क्षेत्र रसातळाला जाऊ लागले आहे. गुजरातमध्ये मात्र राजकारण बाजूला ठेवल्याने सहकारी चळवळ 'अमूल'च्या रूपाने तेथील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अमूल्य ठरली आहे. आजचा तरुण शेतकरी दूध व्यवसाय करायला उत्सुक आहे पण गावापासून ते शेतापर्यंतच्या रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. शेतापर्यंत वीज नाही.सरकारने सोयी-सुविधा दिल्यास दूध व्यवसाय वाढू शकतो पण त्याकडे लक्ष देणार कोण?

राजकीय

# विरोधी पक्षांचा मोदीद्वेष...

**नवीन संसद भवनाच्या उद्घाटनात अडथळा निर्माण करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर विरोधी पक्षांनी आपले बहिष्काराचे शस्त्र म्यान करून उद्घाटनाच्या कार्यक्रमाला हजर राहायला हवे होते. पण राष्ट्रपतींच्या नावाची ढाल पुढे करून पंतप्रधान नरेंद्र मोदींना विरोध करायचा ही विरोधकांची रणनीती होती. देशातील सारी जनता नवे संसद भवन आपला अभिमान आहे. या भावनेने प्रेरित झाली होती. पण काँग्रेसपासून उबाठा सेनेपर्यंत सारे विरोधक मोदी सरकारने लोकशाहीचा गळा घोटला म्हणून टाहो फोडत राहिले. मोदींची जागतिक लोकप्रियता हीच विरोधी पक्षांची पोटदुखी आहे. संसदीय लोकशाहीतील सर्वोच्च व्यासपीठ असलेल्या नवीन संसद भवनाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच आहे. त्याचा राग विरोधकांना आहे. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर नवीन संसद भवनाचे उद्घाटन कोणी करायचे हा वाद संपुष्टात यायला हवा होता. पण मोदी सरकारने संविधानाचा अवमान केला अशी जपमाळ काँग्रेसने चालू ठेवली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मोदी सरकारने डावलले आणि आदिवासी महिलेचा अवमान केला असा २१ विरोधी पक्षांनी दोन आठवडे आक्रोश चालवला होता. विशेष म्हणजे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत ज्या राजकीय पक्षांनी द्रौपदी मुर्मू यांच्या उमेदवारीला विरोध केला होता, तेच त्यांच्याविषयी कळवळा आल्यासारखे बोलत आहेत. जर आदिवासी महिलेविषयी एवढा आदर विरोधी पक्षाला होता. मग त्यांची राष्ट्रपतीपदावर बिनविरोध निवड का केली नाही?**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

सन २०20 मध्ये छत्तीसगड विधान भवनाचे उद्‌घाटन तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी केले होते, ते कोणत्या अधिकारात? ते दोघे खासदार होते व आजही आहेत. पण ते छत्तीसगड राज्याचे निवासी नाहीत किंवा त्या राज्यांचे संसदीय खासदार म्हणून प्रतिनिधित्वही करीत नाहीत. मग राज्यपालांना डावलून त्यांच्या हस्ते विधानसभा भवनाचे उद्‌घाटन कसे झाले? सन २०१४ मध्ये झारखंड व आसाममध्ये काँग्रेसप्रणीत यूपीएच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी तेथील विधान भवनांचे उद्‌घाटन केले होते. दोन्हींकडे राज्यपालांना निमंत्रित केले नव्हते. सन २०२३ मध्ये तेलंगणामध्ये विधान भवनाचे उद्‌घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. नवीन संसद भवनाची गरजच काय, असे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार विचारत आहेत. पण बिहार विधानसभा इमारतीचे उद्‌घाटन राज्यपालांना डावलून नितीश कुमार यांनी स्वत:च केले, याचा त्यांना विसर पडलेला दिसतोय. दिल्लीतील इंडिया गेटवरील शहिदांच्या स्मरणार्थ अमर ज्योती जवान स्मारकाचे उद्‌घाटन तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २१ जानेवारी १९७२ रोजी केले होते. तेव्हाचे राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी होते. राष्ट्रपती हे तीनही सेनादलाचे प्रमुख असतात. मग त्यांना अमर जवान ज्योतीचे उद्‌घाटन करायला काँग्रेसने का बोलावले नव्हते? १९७१च्या तेरा दिवस चाललेल्या बांगला देश युद्धात ३८४३ जवान शहीद झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ अमर जवान ज्योती स्मारक उभारण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. दिल्ली मेट्रोचे उद्‌घाटन डिसेंबर २००२ मध्ये झाले. दिल्ली ही राष्ट्रीय राजधानी आणि केंद्रशासित प्रदेश आहे. तेव्हा एपीजे अब्दुल कलाम राष्ट्रपती होते, पण उद्‌घाटनाचे निमंत्रण पंतप्रधानांनाच दिले गेले. दिल्लीचे नायब राज्यपाल हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतात. त्यांना



महत्त्व दिले गेले नाही. काँग्रेस या विषयावर बोलणारही नाही. नॅशनल वॉर मेमोरिअलचे उद्‌घाटन २०१९ मध्ये इंडिया गेट परिसरात अमर जवान ज्योती स्मारकाजवळ झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याचे उद्‌घाटन केले होते. वॉर मेमोरिअलमध्ये २७ हजार शहीद जवानांच्या नावांचा उल्लेख आहे. नवीन संसद भवनचे उद्‌घाटन पंतप्रधानांनी केले म्हणून आज विरोधकांनी जसा आरडाओरड केला तसाच तेव्हाही केला होता. मोदींनी उद्‌घाटन केले की विरोध, पण काँग्रेस व अन्य पक्षांनी त्यांच्या राज्यात काही केले की चिडिचूप, असा दुटप्पीपणा विरोधकांमध्ये दिसून येतो. इंदिरा गांधींनी २४ ऑक्टोबर १९७५ रोजी संसद भवन विस्ताराचे किंवा राजीव गांधींनी १५ ऑगस्ट १९८७ रोजी संसदेच्या ग्रंथालय इमारतीचे उद्‌घाटन केले तेव्हा ते योग्य होते पण नरेंद्र मोदींनी नवीन संसद भवनाचे केले की त्याला विरोध करायचा, हा निव्वळ मोदीद्वेष आहे. तेलंगणाच्या राज्यपाल तमिलीसाई सुंदरराजन यांना मुख्यमंत्री चंद्रशेखर राव हे कोणत्याही सरकारी कार्यक्रमाला बोलवत नाहीत. तेलंगणा सचिवालयाच्या इमारतीच्या उद्‌घाटनाही त्यांना बोलवले नाही. गेल्या ९ वर्षांत ५ राज्यांत विधानसभा इमारतींचे उद्‌घाटन झाले. पण ते कार्यक्रम त्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्तेच झाले. मणिपूर विधानसभा इमारतीचे उद्‌घाटन सोनिया गांधींनी केले, पण ते कोणत्या अधिकारात हे काँग्रेस कधी सांगत नाही. संसद भवन ही देशाची अभिमानास्पद व राजधानीतील वैभवशाली वास्तू आहे. दिल्लीत जुने संसद भवन, राष्ट्रपती भवन, इंडिया गेट, कॅनॉट प्लेस अशा अनेक जुन्या आणि भव्य वास्तू आहेत. पण त्या ब्रिटिशांनी उभारल्या आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या अमृत महोत्सवी वर्षात मोदी यांनी पुढाकार घेऊन उभारलेले नवीन संसद भवन ही राजधानीतील भव्य-दिव्य व अत्याधुनिक तंत्रज्ञाचा वापर करून वास्तू उभारली आहे. संसद भवन ही देशाची संपत्ती आहे. संसद भवन हे देशातील लोकशाहीचे मंदिर आहे. पण संसदेच्या अधिवेशनात रोज गोंधळ व गदारोळ घालून कामकाज बंद पाडण्याचा विक्रम काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांनी केला आहे. मोदी सरकारला कामकाज करू द्यायचे नाही, असा चंग विरोधी पक्षांनी बांधला आहे. ज्या संसद भवनाच्या उद्‌घाटनाला जायचे नाही मग नंतर तिथे निवडून तरी कोणासाठी जायचे? कामकाज बंद पाडण्यासाठी? संसद भवन ही काही कोणा एका व्यक्तीची खासगी मालमत्ता नाही. पण ही वास्तू म्हणजे मोदी महाल आहे, अशी टवाळी करून विरोधकांनी काय साध्य केले? तामिळनाडूतील ब्राह्मणांनी केलेल्या मंत्रोच्चारात नवीन संसद भवनाचे उद्‌घाटन झाले अशीही टीका विरोधी पक्षांनी केली. पण सेंगल सुपूर्द करण्यासाठी आलेले भगवे वस्त्रधारी ओबीसी होते हे समजल्यावर विरोधकांची तोंडे गप्प झाली. नवीन संसद भवन ही देशाची गरज होती. मोदींनी ती ओळखली व अवघ्या २६ महिन्यांमध्ये हे भव्य नवीन संसद भवन त्यांनी उभारून दाखवले. अडीच वर्षे संपूर्ण देश कोविडच्या संकटाशी झुंजत असताना नवीन संसद भवनच्या उभारणीचे काम अहोरात्र चालूच होते. नवीन संसद भवनाला ९६२ कोटी रुपये खर्च आला.

(दिल्लीत केजरीवाल यांच्या निवासस्थानावर सजावटीसाठी ५२ कोटी रु. खर्च झाला) लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या उपस्थितीत पंतप्रधानांनी त्याचे २८ मे रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीला उद्‌घाटन केले. पण स्वा. सावरकरांच्या जयंतीला उद्‌घाटन केले म्हणूनही विरोधी पक्षाला खटकले. स्वातंत्र्यवीर सावरकर हे पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच भारतीय जनता पक्षाचे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रेरणास्थान आहेत. दुसरीकडे सावरकरांना माफीवीर संबोधून काँग्रेसने स्वत:ची किंमत कमी करून घेतली आहे. मोदींच्या कार्यक्रमाला ऑस्ट्रेलियातील सत्ताधारी-विरोधी पक्ष एकत्र येतात, आजी-माजी पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेते हजर राहतात, मग भारताच्या नवीन संसद भवनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमावर बहिष्कार घालून २१ विरोधी पक्षांनी काय साध्य केले?

**- डॉ. सुकृत खांडेकर.**


टुडेज् ब्लॉग

# पंजाबच्या वाघाची बॅटीतून डरकाळी

शुभमन गिल या तरण्याबांड क्रिकेटपटूचं सध्या सर्वजण तोंड भरून कौतुक करत आहेत आणि त्याचं कौतुक का करू नये? २६ मे रोजी त्याने मुंबई इंडियन्सविरुद्ध केलेली कामगिरी अगदी तुफानी होती. किंबहुना मुंबईला आयपीएलच्या फायनलमध्ये रोखण्याची धाडसी कामगिरी शुभमनने केली म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्या २६ मे रोजी गुजरातमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये चुरशीची लढत झाली. कारण यातून विजेता संघ फायनलला चेन्नईशी दोन हात करण्यासाठी जाणार होता. अशातच गुजरातच्या टीमने सुरुवातील बॅटिंग करताना २३३ ची खेळी केली. त्यात शुभमनचा वाटा होता १२९ धावांचा.

अगदी आकड्याच्या भाषेत बोलायचं तर शुभमनने अवघ्या ६० बॉलमध्ये १२९ धावा झोडून काढल्या होत्या. हो झोडूनच म्हणावं लागेल कारण त्याने पहिल्या ३२ बॉलमध्ये अर्धशतक मारलं. त्यानंतर पुढच्या १७ बॉलमध्ये ५० धावा काढल्या. आणि हे कमी म्हणून की काय शेवटच्या ११ बॉलमध्ये २९ धावा काढल्या. शुभमनच्या बॅटिंगमध्ये इतका आत्मविश्वास होता की, 'मुंबई इंडियन्सचे सर्व बॉलर हतबल झाले होते. हा पठ्ठ्या कुठल्या बाजूला चेंडू सीमापार करेल, याचा कुणालाच अंदाज येत नव्हता. त्याने मुंबई इंडियन्सच्या प्रत्येकाला सळो की पळो करून सोडलं होतं.'



आयपीएलचा यंदा सोळावा हंगाम. या हंगामात शुभमनची कामगिरी जबरदस्त आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा विराट कोहली, राजस्थानचा जोस बटलर यांच्या पाठोपाठ शुभमन गिलचा नंबर आहे. विराट कोहलीने १६ सामन्यात ४ शतकांसह ९७३ धावा काढल्यात. जोसने १७ सामन्यात ४ शतकांसह ८६३ धावांची कमाई केली आहे. तर शुभमने १६ सामन्यात ३ शतके ठोकली असून एकूण ८५१ धावा काढल्या आहेत.


पंजाबच्या या २४ वर्षांच्या वाघानं २०-२०, एकदिवसीय आणि कसोटी अशा क्रिकेटच्या तिन्ही फॉर्ममध्ये धडाकेबाज कामगिरी केलीय. मैदानात आक्रमक असलेला शुभमन मैदानाबाहेर आला की अगदी साधासुधा असतो. शांतपणे खुर्चीवर बसतो आणि इतरांच्या खेळण्याचा आनंद घेतो. त्याच्या चेहऱ्यावरील हास्य इतकं लोभसवाणं असतं की कुणीही त्याच्या प्रेमात पडावं. म्हणूनच मुंबई इंडियन्सविरोधातील त्याच्या कामगिरीचं सचिन तेंडुलकरलाही कौतुक करण्याचा मोह आवरला नाही.

यंदाचा आयपीएलचा सीझन शुभमन गिलने त्याच्या तडाखेबाज बॅटिंगने गाजवला. शुभमनची एक स्टाईल सर्वांचंच लक्ष वेधून घेते. त्याने अर्धशतक किंवा शतकी खेळी केली की तो कमरेतून वाकून प्रेक्षकांना अभिवादन करतो, त्याची ही लकब आता खूप लोकप्रिय झाली आहे आणि म्हणूनच प्रेक्षकही त्याच्यावर फिदा आहेत. पंजाबच्या प्रथम श्रेणी, त्यानंतर १९ वर्षांखालील संघ, पुढे टीम इंडियात निवड झालेल्या शुभमनची कामगिरी दिवसेंदिवस बहरत चालली आहे, ही भारतासाठी खूप जमेची बाजू आहे.

**- अविनाश चंदने.**

जन्म हा अखेरचा

# इंद्रियानुग्रहस्थल - २



उलट खालच्या वर्गात, बालवाडीत येतात, म्हणतात, 'महाराज, काय करावे? प्रपंच वाढलाय. रोज १०८ जप करणे जमत नाही. म्हणून ५० च करतो. चालेल का?' 'आम्हाला वाटते 'नाही' म्हणावे तर हेदेखील सोडतो. म्हणून आम्ही म्हणतो, 'हो चालेल.' काही लोक ५० वरुन २५ वर येतात तर काही जण ५ वरच येतात.


आपल्या नामस्मरणाची अशी अवस्था आहे. ही प्रगती आहे की अधोगती? व्यापारात जास्तीत जास्त नफा मिळवणे याला प्रगती म्हणतात. नामस्मरण असेच वाढवावे लागते. तुम्ही व्यापारात कितीही पैसे मिळवले तरीही ते शेवटी उपयोगी पडणार नाहीत. समजा, तुमच्याकडे दहा लक्ष रुपये आहेत. परंतु अंतकाळी त्या दहा लक्षाला मूल्य नाही. त्यावेळी तुम्ही केलेला दहा हजार जप अधिक मौल्यवान असतो. इहलोक सोडून जाताना कुणालाही धनदौलत घेऊन जाता येत नाही. त्याला केवळ धर्म घेऊन जाता येते. यासाठीच आपल्याला इंद्रिये, मन आणि प्राण भगवद्‌र्पण करावे लागतात. आपल्याला संसारही करायचा असतो आणि परमार्थ देखील साधायचा असतो. जशी भौतिक प्रगती करुन घेतली पाहिजे, तशीच आध्यात्मिक प्रगतीही झाली पाहिजे. पहिल्या वर्षी १०८ जप करीत असाल तर दुसऱ्या वर्षी २०८ करावा, तिसऱ्या वर्षी ३०८ करावा. नामजपाचा अभ्यास वाढता ठेवावा. भगवन्नामात मुक्ती देण्याचे सामर्थ्य आहे तसेच भुक्ती अर्थात सुखोपभोग देण्याचे सामर्थ्यही आहे. जन्मल्याबरोबर आपली कुंडली तयार केली जाते. कुंडलीतील बारा स्थाने म्हणजेच आपल्या जीवनाचे बारा पैलू असतात. मातृ-पितृ, संतती, लाभ, शत्रू, मित्र, मृत्यू इत्यादींचे एकेक स्थान असते. त्या स्थानी असलेल्या ग्रहांच्या प्रभावाखाली सर्व गोष्टी घडत असतात. कुंडलीतले ग्रह कोणाही ज्योतिष्याला बदलता येत नाही. बरेच ज्योतिषी तर गावभर सर्वांची भविष्ये पाहून आपला हात दुसऱ्या ज्योतिष्याला दाखवत असतात. कुंडलीतील ग्रहांची स्थाने कुणालाही बदलता येणे शक्य नाही. परंतु भगवन्नामात मात्र ते सामर्थ्य आहे. एका स्थानासाठी एक कोटी जप करावा, असे शास्त्रात म्हटले आहे. अशा प्रकारे बारा स्थानांसाठी बारा कोटी जप करावा लागेल. परंतु एवढे पुरेसे नाही. त्यापुढे भगवंताची प्राप्ती हे लक्ष्य असले पाहिजे. त्यासाठी आणखी एक कोटी जप करायला हवा. अशाप्रकारे तेरा कोटी जप केल्यावर भगवंताची प्राप्ती होती. नामजपात एवढे सामर्थ्य असताना 'महाराज' रोज पाच वेळा जप केला तर चालेल ना, असे काही महाभाग विचारतात. **(क्रमश:) - काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# लोकप्रतिनिधींकडून शिस्तीची अपेक्षा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २८ मे रोजी नवीन संसद भवनाचे दिमाखदार सोहळ्यात उद्‌घाटन झाले. नवीन संसद भवन हे आत्मनिर्भर भारताचे प्रतीक असून अतिशय आकर्षक, भव्यदिव्य आणि अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असे हे नवे संसद भवन म्हणजे भारताच्या लोकशाहीचे प्रतीक आहे. संसद भवन म्हणजे लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे. या पवित्र मंदिरात बसून लोकप्रतिनिधी आपल्या जनतेचे प्रश्न सोडवत असतात. नवीन कायदे बनवत असतात. देशाच्या उज्ज्वल भविष्याचे निर्णय याच लोकशाहीच्या पवित्र मंदिरात घेतले जातात.

संसद भवन म्हणजे १४० कोटी देशवासियांच्या आकांक्षा आणि स्वप्नांचे प्रतिबिंब आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात देशाला लोकशाहीचे प्रतीक असलेले नवीन संसद भवन मिळाले याचा देशवासियांना सार्थ अभिमान आहे. यावर्षीच्या पावसाळी अधिवेशनपासूनच या संसद भवनात कामकाज सुरू होईल. आता याच नवीन संसद भवनात बसून लोकप्रतिनिधी जनतेचे प्रश्न मांडतील, जनतेचे प्रश्न सोडवतील ही अपेक्षा आहे. मात्र हे करत



असताना लोकप्रतिनिधींकडून जनतेच्या काही अपेक्षा आहेत.

नवीन संसद भवनात जनतेची लोकप्रतिनिधींकडून सर्वात मोठी अपेक्षा आहे ती म्हणजे शिस्तीची. आपल्या लोकशाहीला खूप मोठी परंपरा आहे. अलिकडे संसद भवनातील लोकप्रतिनिधींची वर्तणूक लोकशाहीला साजेशी नसते. याला कोणत्याही बाजूचे लोकप्रतिनिधी अपवाद नाहीत. लोकप्रतिनिधींनी असंसदीय भाषेचा वापर केल्यास तसेच संसदेत बेशिस्त वर्तन केल्यास लोकांच्या भावना दुखावतात. लोकप्रतिनिधींनी लोकशाही मूल्यांचे पालन करण्याची अपेक्षा आहे. सभागृहातील चर्चेवेळी अनावश्यक कडवटपणा निर्माण होणार नाही याची काळजी दोन्ही बाजूंच्या लोकप्रतिनिधींनी घ्यावी. संसदीय लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षासोबत विरोधकांचीही महत्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे सामंजस्य, सहकार्य आणि अर्थपूर्ण विचारांची देवाणघेवाण व्हावी. सत्ताधाऱ्यांनीही विरोधकांच्या मतांचा आदर करावा. जर शिस्त राखून सर्वांनी एकदिलाने काम केले तरच लोकशाहीचे आणि संसदेचे पावित्र्य राखले जाईल.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

# श्रीराम इंग्लिश स्कूल : ३३ वर्षांनी ३५ माजी विद्यार्थी एकवटले

सोलापुरातील पद्मशाली शिक्षण संस्थेच्या डी. आर. श्रीराम इंग्लिश मीडियम स्कूलमधील सन १९९०-९१ मध्ये दहावी झालेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शाळेच्या परिसरात नुकताच उत्साहात पार पडला. नोकरी-व्यवसायानिमित्त बाहेरगावी असणाऱ्या ३० ते ३५ माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तब्बल ३३ वर्षांनी एकत्र येऊन शाळेतील आठवणींना उजाळा दिला.

वर्गातील सगळ्या मुलांनी एकत्र भेटावे, अशी संकल्पना साधारण वर्षभरापूर्वी मनात आली; मात्र नोकरी-व्यवसायानिमित्त बाहेरगावी असणारे वर्गमित्र आणि लग्न होऊन बाहेर गेलेल्या विद्यार्थिनी यांचे संपर्क क्रमांक मिळवणे अवघड होते; तरीही प्रयत्न म्हणून सोलापुरातील विमा व आरोग्य विमा सल्लागार हनुमंत जाधव, वजन मापे उत्पादक अशपाक शेख, मुंबई येथे वास्तव्याला असणाऱ्या टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडचे सहाय्यक उपाध्यक्ष मनीष कोटा, उद्योगपती जगदीश बोमड्याल, इंजिनीयर गणेश चिंताकिंदी, पुण्यातल्या बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील शरीर विकृतीशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ. नलिनी उडता-काडगी, अनुराधा कन्ना-पुलगम या सर्वांनी मिळून आपल्या सर्व वर्ग मित्रांना फोन केला. त्यानंतर ३३ वर्षांपूर्वी शिकवणारे शिक्षक यांच्याशी संपर्क झाला परंतु दुर्दैवाने त्यातील काही शिक्षक आज आपल्यात नाहीत. पण जे आहेत त्यांना सोबत घेऊन शाळेत गेट-टुगेदरचा कार्यक्रम अतिशय आदरपूर्वक केला. त्यातूनच एक एक करत ३५ हून अधिक वर्गमित्र-मैत्रिणींशी संपर्क झाला. मग सगळ्यांच्या अडी-

\- प्रासंगिक -

अडचणी, नोकरी, सुट्ट्या सांभाळून तब्बल ३३ वर्षांनी प्रथमच सर्वजण एकमेकांना भेटल्यानंतर आनंद गगनात मावेनासा झाला. हा गेट-टुगेदर शाळेच्या परिसरातच आयोजित केला होता. एक पूर्ण दिवस आम्ही शाळेत आणि शाळेतल्या जुन्या आठवणींना उजाळा देत रमत घालवला.

सकाळी साडे नऊ वाजता आम्ही शाळेत जमलो. एकमेकांचा परिचय करून घेतल्यानंतर काही करमणुकीचे कार्यक्रम सादर केले. दुपारी सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद लुटला. त्यानंतर प्रत्येकाने आपण ३३ वर्षांच्या प्रवासात काय केले याचे अनुभव सांगितले. सर्व मित्र महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राच्या बाहेर




विविध ठिकाणी कामासाठी वेगळे असले तरी त्यांची नाळ आपल्या गावाशीच जोडली आहे हे त्यांनी वारंवार त्यांच्या कृतीतून दाखवून दिले.

पार तळाशी जाऊन मन त्या-त्या नावांशी जोडल्या गेलेल्या आठवणी जागवल्या. मला वाटतं प्रत्येकाची कमी अधिक प्रमाणात हीच अवस्था होती. कसे कोठून येतो आपण, कसे नकळत जातो गुंतून, मग ओळख परेड झाली आता आमचे तेव्हाचे ज्येष्ठ शिक्षक आणि सर्वांनाच शिस्तीत आणणारे मराठी, पी. टी. आणि आर. एस. पी.चे शिक्षक पद्माकर कुलकर्णी, मराठीच्या शिक्षिका शशिकला माढेकर, हिंदीचे शिक्षक मिलिंद यादव, सायरा शेख, सध्या शाळेमध्ये कार्यरत असलेल्या प्राचार्या अजिता पिल्लई मॅडम,आग्नेस, शहनाज शेख, पद्मा अय्यर, राजश्री अय्यर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिक्षकांबरोबरच मनीष कोटा-प्रोजेक्ट इंजिनियर, अश्फाक शेख, वजन मापे उत्पादक, श्रीनिवास जक्कन-इंजिनियर, श्रीनिवास कांचन-टॉवेल कारखानदार, गोपी मलपेदी -निरीक्षक, औद्योगिक सुरक्षा, डॉक्टर अरुणा हावले,यशवंत धडके-रियल इस्टेट कन्सल्टंट,जगदीश बोंबड्याल -उद्योगपती गणेश चिंताकिंदी -इंजिनियर, नागेश मंथन, रामकृष्ण येमूल, सतीश बत्तुल, प्रशांत गांगजी, प्रसाद जगताप, नदाफ, राजश्री सोमा, अनुराधा कन्ना-पुलगम, शबाना कोराली यांनी हा गेट-टुगेदर करण्यासाठी खूप मेहनत घेतली. ठरल्याप्रमाणे हळूहळू सगळे जमा झाले. पुन्हा शाळा भरल्याचा भास झाला वयाचा विसर पडून सगळ्यांचा नुसता किलबिलाट चालू होता. कोण कुठे असतं? काय करता? मुलं किती तू अजून आहे, तशीच आहेस हा किती मस्ती करायचा. शाळेत आणि आता किती शांत झाला आहे. कोण शाळेतला चॉकलेट बॉय तर कोणी हुशार मुलगा कोणी अगदीच लाजाळू पण आता खूप बडबड करणारा कोण खूप बारीक असणारा आता बायकोच्या हातचा चमचमीत खाऊन गोल गरगरीत झालेला. कोण हॉलिवूडचा हिरो तर कोणी पक्का बिझनेस नाही कुणी मेडिकल क्षेत्रात कोणी आर्मीमध्ये तर कोणी कुशल शेतकरी मुलीही अशाच छान आपल्या संसारात सुखी समाधान असणाऱ्या संसार सांभाळून काही जण शिक्षण क्षेत्रात योगदान देत आहेत समाजाचं ऋण फेडत आहेत. किती सांगू असं प्रत्येकाबद्दल लिहायला लागलं तर लेखणी आणि कागद अपुरा पडेल अशी ही सगळी पात्र आपला रोजचा व्याप बाजूला ठेवून आपल्या जुन्या मित्रांना भेटण्यासाठी आतुरतेने जमलेल्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता.

**- पद्माकर कुलकर्णी.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# वडिलांना पळवून नेताना पाठलाग करून सोडवणाऱ्या मुलास जबर मारहाण

✔ सुराज्य/पंढरपूर

वडिलांना चार चाकी वाहनातून पळवून नेल्यानंतर त्याचा पाठलाग करीत वडिलांना सोडविण्यासाठी गेलेल्या मुलास लोखंडी रॉड, काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करून जखमी करण्यात आले . ही घटना सुस्ते (ता.पंढरपूर) येथील तुंगत रोडवर बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली.

गणेश तुकाराम चव्हाण (वय ३८ रा.सुस्ते ता.पंढरपूर) असे जखमींचे नाव आहे . त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात पहाटे दाखल करण्यात आले . त्यांना निलेश सुखदेव चव्हाण, त्याचा भाऊ बाबुराव चव्हाण, विश्वजीत पवार, रामेश्वर चव्हाण आणि महेश रोकडे अशा पाच जणांनी मिळून मारहाण केली. जखमी गणेश चव्हाण यांचे वडील तुकाराम चव्हाण यांना वरील आरोपींने चार चाकी वाहनात बसवून पळवून नेले होते. घराजवळील तुंगत रोडवर नेऊन त्यांना मारहाण करीत होते . त्यावेळी गणेश चव्हाण हे भांडण सोडवण्यात गेले असता त्यांना मारहाण करण्यात आली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

**कुर्बान हुसेन नगर येथे मारहाण**

शास्त्री नगर परिसरातील कुर्बान हुसेन नगर नजीक असलेल्या पोस्ट ऑफिस जवळ तलवार, हॉकी स्टिक, काठी आणि दगडाने केलेल्या मारहाणीत तिघेजण जखमी झाले. ही घटना बुधवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली. रमजान मशाक



शेख (वय २२), सलमान जैनु नदाफ (वय २४) आणि सैपन रफिक नदाफ (वय २२ सर्व रा.कुर्बान हुसेननगर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री ८ वाजेच्या सुमारास त्यांना जमीर शेख, रिहान हुंडेकरी, जमीर शेख आणि इतर ६ जणांनी मिळून विनाकारण मारहाण केली . अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

**विष प्राशनामुळे मृत्यू**

शहरातील एकता नगर परिसरातील सत्यम हॉटेल जवळ राहणाऱ्या संदीप सिद्धप्पा बिराजदार (वय ४०) या विवाहित इसमाने विष आणि झोपेच्या गोळ्या सेवन करून आत्महत्या केली. प्रॉपर्टी विकण्याच्या कारणावरून त्याने १९ मे रोजी सायंकाळच्या सुमारास राहत्या घरात हा प्रकार केला होता . आरती (पत्नी) यांनी त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो गुरुवारी सकाळी मयत झाला. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

**धोंडीबा वस्तीत २ गटात मारहाण**

सोलापूर -रामवाडी परिसरातील न्यू धोंडीबा वस्ती येथे पूर्वीच्या भांडणावरून दोन गटात लोखंडी रॉड, सळई, काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणी दोन महिला सह चौघेजण जखमी झाले. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. सर्व जखमींना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मंगल प्रवीण कदम (वय ४० रा.न्यू धोंडीबा वस्ती) असे पहिल्या गटातील जखमीचे नाव आहे. तिला काल रात्री घराजवळ समीर नदाफ याने सळईने डोक्यात मारून जखमी केले . तर दुसऱ्या गटातील मालन मुर्तूज नदाफ (वय ३२) तिचा मुलगा साहिल नदाब (वय १७) आणि समीर मेहबूब नदाफ (वय २६ सर्व रा.न्यू धोंडीबा वस्ती) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना मंगल कदम, परक्या आणि अन्य चौघांनी लोखंडी रॉड, काठी आणि लाथाबुक्याने मारहाण केली. अशी नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली आहे.



## विजयकुमार वसंतपुरे यांची निवड

✔ **मोडनिंब** : सांस्कृतिक मंत्रालय ,भारत सरकार व सांस्कृतिक स्त्रोत प्रशिक्षण केंद्र ,दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेत डिजिटल डिस्ट्रिक्ट रेपोझिटरी या उपक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा आंदेवाडी येथील शिक्षक विजयकुमार वसंतपुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देशात आजादी का अमृत महोत्सव हा उत्सव सुरू असून देशातील स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतलेल्या व्यक्तींची नोंद वेब पोर्टलवर घेण्याचे काम सध्या सुरू आहे .सोलापूर जिल्ह्याचा इतिहास देदीप्यमान असून हा इतिहास पोर्टलवर नोंदवण्यासाठी सी सी आर टी यांच्यामार्फत कार्य सुरू आहे.आतापर्यंत सोलापूरच्या ६४ कथा पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या आहेत.सोलापूर जिल्ह्यातील ५० शिक्षकांची कार्यशाळा जून महिन्यात आयोजित केलेली असून जिल्ह्यात इंग्रजाविरुद्ध लढलेल्या सर्व योद्ध्यांची माहिती शोधून ,संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्याचे काम हे शिक्षक करणार आहेत.वसंतपुरे यांचे प्रशिक्षण फेब्रुवारीमध्ये हैदराबाद येथे झाले असून त्यानंतर केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे दिल्ली येथे संपन्न झालेल्या कार्यशाळेत सी सी आर टी चे अध्यक्ष डॉ. विनोद नारायण इंदुरकर व डायरेक्टर ऋषी कुमार वशिष्ठ यांनी सोलापूर जिल्ह्यातील डी डी आर चे साधन व्यक्ती पदी निवड केली आहे.या यशाबद्दल सोलापूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी,प्राथमिकचे शिक्षणाधिकारी संजय जावीर,गटशिक्षणाधिकारी कुदसिया शेख,विस्तार अधिकारी हरिश्चंद्र गायकवाड,केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे,मुख्याध्यापक अभिजीत सुर्डीकर यांनी अभिनंदन केले आहे.



## मळोली ग्रा.म.मध्ये चार महिलांचा सन्मान

✔ **वेळापूर** : मळोली ग्रामपंचायत कार्यालय येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन मळोली ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक व पंचायत समिती सदस्य रणजीत सिंह जाधव आणि मळोली सरपंच सौ अर्चना रणजीतसिंह जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविका सुमित्रा भागवत जाधव, संगीता तानाजी वाघमारे, मनीषा बाळासाहेब सुरवसे, सुनीता रायबा जाधव या चार महिलांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार मळोली सरपंच सौ अर्चना रणजीत सिंह जाधव यांच्या हस्ते देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला तसेच पोलीस भरती झालेले भगवान हरी भोसले, काजल शहाजी माने, स्वप्नाली दिलीप जाधव या सर्वांचा पंचायत समिती सदस्य रणजीतसिंह जाधव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला उपसरपंच ॲड. महादेव पवार, ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब जाधव, संतोष जाधव , शैनाज मुजावर, शाबीर मुजावर, सुरेश जाधव, बाळकृष्ण जाधव, प्रभाकर इंगळे सर देशमुख, नितीन जाधव, बाळासाहेब जाधव, शहाजी माने, अनिल माने उपस्थित होते.



## अहिल्याबाई होळकर पुरस्काराने रेश्मा मोरे यांचा सन्मान

✔ **मोडनिंब** : महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या अहिल्याबाई होळकर पुरस्कार बावी येथील सामाजिक कार्यकर्त्या आणि बचत गट चळवळीच्या नेत्या रेश्मा मोरे यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास बावीच्या सरपंच वंदना मोरे, ग्रा पं सदस्या पूजा नंदकुमार मोरे, ग्रा पं सदस्य भाजपा तालुका सरचिटणीस दत्तात्रय मोरे, नंदकुमार मोरे, अरुण मोरे, रोटरीचे अध्यक्ष औदुंबर पाटील, सुनील आप्पा मोरे, कल्याण मोरे, ग्रामसेवक यादव भाऊसाहेब, तलाठी मोहिते भाऊसाहेब आणि गावातील नागरिक व महिला उपस्थित होत्या.

## शेतात चरण्यासाठी शेळी सोडल्यावरून मारहाण

✔ **अक्कलकोट** : आमच्या शेतात चरन्यासाठी शेळी का सोडतो असे म्हणतात फिर्यादीस मारहाण करून केले जखमी. ही घटना दि.३१ मे रोजी सकाळी ८ वाजता घडली आहे. याबाबत दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हकीकत अशी की फिर्यादी चिंचोळी(न) ता. अक्कलकोट येथील कन्नड शाळे समोर सिध्दार्थ कलाप्पा भैरगुंडे हा उभा होता त्यावेळी मी व माझे मुलगा बंडगर असे आम्ही सिध्दार्थ कलाप्पा भैरगुंडे यास तु आमचे शेतात शेळया चरण्यास का सोडतो तु शेता चरण्यासाठी सोडल्यानंतर आमचे शेतातील पिकाचे नुकसान होत आहे. तु आम्हास सारखे शिवीगाळी का करतो असे जाब विचारत असताना सिध्दार्थ याने तुम्हच्या शेतापैकी थोडे रान आमच्या शेतात येते ते रान आम्हाला दे नाही तर रोज शिवीगाळी करीन आणि शेळया तुम्हच्या शेतात चरण्यास सोडेन असे म्हणून तुला काय करायचे ते असे म्हणून दमदाटी करून, शिवीगाळी करू लागला त्यावेळी मी व माझा मुलगा बिरण्णा असे आम्ही सिध्दार्थ भैरगुंडे यास समजावून सांगत असताना सिध्दर्थ भैरगुंडे याने मला म्हाताऱ्या तुला लई मस्ती आली आहे का म्हणून हाताने लाथाबुक्याने मारहाण करीत असताना व मला मारहाण होत असलेली पाहून माझा मुलगा बिरण्णा बंडार हा सोडवा सोडवी करीत असताना सिध्दार्थ भैरगुंडे याने माझा मुलग बिरण्णा बंडगर यास ही हाताने लाथाबुक्याने मारहाण करून बाजुला पडलेली काठी त्याचे हातात घेवून माझे डोक्यात जोराने मारून जखमी केला आहे. सिध्दार्थ कलाप्पा भैरगुंडे याचे विरूध्द तक्रार दिला आहे. याबाबत फिर्यादी शेखण्णा मुतन्ना बंडगर यांनी दिली आहे. अधिक तापस अंमलदार पोहेकॉ जाधव हे करीत आहेत.

## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

✔ **सोलापूर** : जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार ५ जून २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू हॉलमध्ये आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

या लोकशाही दिनात मागील महिन्यातील प्रलंबित निवेदन व अर्ज, माहिती अधिकार अदि-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्या लोकशाही दिनातील अर्जावरही कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

## जुने भांडण उकरून काढले आणि गोळ्या झाडल्या

✔ सुराज्य/अक्कलकोट

जुन्या भांडणाचा राग मनात धरून वादविवाद मध्ये फिर्यादी वर दोन गोळ्या झाडले. घटना दि.३० मे रोजी दु.२ ते साडेपाच या दरम्यान घडली आहे.याबाबत दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हकिकत अशी की यातील आरोपी नंबर एक व दोन यांनी संगणमत करून फिर्यादींचे काका वर्धनप्पा भिमशा बिराजदार याचे शेतातहद्दी कोणाचे दगड रवण्यास गेले असता गेले दोन-तीन वर्षा मागील भांडणाचा राग मनात धरून यातील फिर्यादी व फिर्यादीच्या भावाशी वाद विवाद करून शिवीगाळी दमदाटी केली. त्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजे सुमारास फिर्यादींचे घरा समोर जाऊन यातील आरोपी नंबर एक याने फिर्यादीस कन्नड भाषेत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. तू नेहमी आमच्या शेताचे विषयां मध्ये येतोस तुला आता जिवंत सोडणार नाही असे म्हणून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने आपले हातातील गावठी पिस्टल मधील बंदुकीतील दोन गोळ्या फिर्यादींचे दिशेने झाडल्या. त्यावेळी फिर्यादींने त्या गोळ्या चुकवल्या त्यानंतर फिर्यादींने जमिनींवर पडलेले विटा चा तुकडा घेऊन आरोपींचे हातावरमारल्याने आरोपींच्या हातातील पिस्टल जमिनींवर पडले व तो पळून गेला. त्यानंतर आरोपी नंबर दोन हा त्याच्या हातात ऊस तोडण्याचा कोयता घेऊनतुम्ही माझ्या भावाला मारायला येता का असे म्हणूनफिर्यादी व फिर्यादी भावास मारणे जात असताना झटापटीमध्ये फिर्यादींचे डाव्या हाताच्या कोपऱ्यात किरकोळ मार लागले आहे पुढील तपास सपोनि काकडे यांच्याकडे दिला आहे याबाबत फिर्यादी- लक्ष्मण रामचंद्र बिराजदार रा. मैसलगी यांनी दिली आहे. आरोपी सुरेश श्रीमंत बिराजदार ,विजयकुमार श्रीमंत बिराजदार दोघे आहेत. गुन्ह्यात गावठी पिस्तूल ,ऊस तोडण्याचा लोखंडी कोयता वापरले आहेत. तपास अंमलदार- सपोनि बाबासाहेब काकडे करीत आहेत.

## पैशाच्या कारणावरून दगडाने मारहाण; चौघांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

पैशाच्या कारणावरून लाथा बुक्क्यांनी व दगडाने मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३१ मे रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास शिवगंगा नगर शेळगी येथे घडली. याप्रकरणी सचिन अशोक फुलारी (वय-२३,रा.शिवगंगा नगर,शेळगी) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून विशाल कांबळे, नागू कांबळे,आनंद कांबळे,राम कांबळे (सर्व रा.शिवगंगा नगर शेळगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी व त्यांचे आई-वडील फिर्यादी यांचा मावस भाऊ संजय बिराजदार असे सर्वजण घराबाहेर बसले होते. त्यावेळी फिर्यादी यांचा मावस भाऊ संजय बिराजदार व विशाल कांबळे यांच्यातील पैशाच्या व्यवहाराच्या कारणावरून विशाल कांबळे व वरील इतर संशयित आरोपी यांनी फिर्यादी व त्यांच्या आई-वडिलांसह मावस भावास, मामा, बहीण, मावशी व काका यांना शिवीगाळ करत हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.त्यानंतर विशाल कांबळे याने रस्त्यावर पडलेल्या दगडाने फिर्यादीच्या खांद्यावर मारहाण केली.तसेच नागू कांबळे यांनी देखील फरशीच्या तुकड्याने डोक्यात मारून जखमी केले.



## भारतीय कुस्तीपंटूच्या समर्थनार्थ राष्ट्रवादी युवक, क्रीडा प्रेमी मैदानात

✔ सुराज्य/सोलापूर

केंद्रशासनाकडून देशातील कुस्ती खेळाडूना पोलिस आणि शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अपमानास्पद वागणूकीच्या विरोधात सोलापूरात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर यांच्या नेतृत्वाखाली शहरातील सर्व क्रीडा प्रेमींनी एकत्रित येत रेल्वे स्टेशन परिसरातील महात्मा गांधी पुतळा येथे काळ्या फिती बांधून मूक निदर्शने करत निषेध केली.


भारत देशाला कुस्तीमध्ये विविध मेडल मिळवून देत,देशाचे नाव उज्वल करणारे विनेश फोगट, साक्षी मलिक, संगीता फोगट, बजरंग पूनिया हे गेल्या महिनाभरापासून दिल्ली येथील जंतर मंतर येथे लैंगिक शोषण विरोधात आंदोलन सुरू आहे. चार दिवसांपूर्वी दिल्ली येथील नविन संसदेसमोर आंदोलन सुरू असताना भारतीय महिला कुस्ती पटूना पोलिसांनी फरफटत नेत ताब्यात घेत आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला. भारतीय महिला कुस्ती पटूंना अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळाली आहे. पोलिसांनी झटापट करून महिला कुस्ती पटूंना ताब्यात घेतल्यानंतर युनायटेड वर्ल्ड रेसलिंग संघटनेने दखल घेतली आहे.क्रीडा प्रेमीसह सर्वच क्षेत्रातून या घटनेचा निषेध करण्यात येत आहे. सोलापूरात देखील राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रभाकर काशीद, गोपीनाथ घोडके, सनी देवकते, मनोज घोडके, अमोल पाटील, राहुल सरवदे, सिद्धू बचूटे, चंद्रकांत पवार, चेतन गायकवाड, मुसा अत्तार, महेश कुलकर्णी, सरफराज शेख, इरफान शेख, संपन्न दिवाकर, सचिन गायकवाड, सागर भोसले, अक्षय जाधव, अमित सुरवसे, सचिन खंडागळे, शरद येच्चे, किरण शिंदे, मकरंद शिवशेट्टी प्रथमेश गवळी, तलहा शेख व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

## दुचाकीवर आलेल्या चोरांनी पैशाची बॅग पळवली

✔ सुराज्य/सोलापूर

मुलीच्या लग्नाच्या खरेदीसाठी बँकेतील एफडी मोडून ती रक्कम घेऊन जाताना अज्ञात दुचाकीवर आलेल्या चोरांनी पैशाची बॅग पळवून नेली. ही घटना लक्ष्मी मार्केट परिसरात गुरूवारी दुपारी घडली. याबाबत मो. सलिम अलिसाहेब मुल्ला (वय-६३, रा. समता नगर, विजापूर रोड) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात दोन चोरांवर गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी मुल्ला यांच्या मुलीचे लग्न आहे. यासाठी लग्नाच्या खरेदी व तयारीसाठी त्यांनी बँकेतील एफडी व रोख रक्कम काढली. ती रक्कम घेऊन आपल्या जवळील बॅगेत ठेवले. ती बॅग घेऊन रिक्षातून लक्ष्मी मार्केट मधील दुकानासमोर जाऊन उतरताना दत्त चौकाकडून एका दुचाकीवर आलेल्या दोघे त्यांच्या जवळ आले. त्या दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या तरूणाने पैशाची बॅग हिसका मारून चोरून नेले.त्यावेळी त्यांनी आरडा ओरड करत असताना दोघे दुचाकीवरून पसार झाले. याप्रकरणी मुल्ला यांनी फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून दोन चोरांवर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा तपास सपोनि धायगुडे करत आहेत.

## भाऊ थावरे पुण्यतिथीनिमित्त प्रा. कुलकर्णी यांचे रविवारी प्रवचन



✔ **सोलापूर** : श्रीसंत साहित्य सेवा संघाचे संस्थापक स्व. दा. का. तथा भाऊ थावरे यांच्या ७ व्या पुण्यतिथीनिमित्त रविवारी (दि. ४) सायंकाळी ६ वाजता चैतन्य भुवन, ज्ञान प्रबोधिनी, उपलप मंगल कार्यालय शेजारी सोलापूर येथे प्रा. मनोज कुलकर्णी यांचे 'ज्ञानेश्वरी भावविश्व' या विषयावर प्रवचन होणार आहे. श्रीसंत साहित्य सेवा संघातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रा. मनोज कुलकर्णी ज्ञानेश्वरींचे अभ्यासक असून शिक्षण प्रसारक मंडळ कुमठे येथे प्राध्यापकपदी कार्यरत आहेत. कै. बाबुराव कामतकर स्मृती निधी पुरस्कृत हा कार्यक्रम होणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष सु.स. देशमुख यांनी सांगितले. उपस्थित राहण्याचे आवाहन रमेश विश्वरूपे, विश्वास जतकर, संजीव कुसुरकर यांनी केले आहे.

## किरकोळ कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण

### आठ जणांवर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

किरकोळ कारणावरून लोखंडी रॉड व लोखंडी पाईपने तसेच दगडाने मारहाण केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३१ मे रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास बेडरपुल सोलापूर येथे घडली. याप्रकरणी विशालसिंग रतनसिंग बडूरवाले (वय-३६,रा. कामाठीपुरा लष्कर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून मनोज किसनसिंग बडूरवाले,पार्वतीबाई किसनसिंग बडूरवाले, राज्यश्री मनोज बडूरवाले,मनीष मनोज बडूरवाले,यश मनोज बडूरवाले,वैष्णवी लुच्चेवाले,रमेश किसनसिंग बडूरवाले,राहुल रमेश सखी (सर्व.रा.कामाठीपुरा,लष्कर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा भाऊ खुशालसिंग बडूरवाले हा बेडरफुल येथे फिर्यादी यांचे भाऊजी अनिल सोनगिलवाले यांच्याबरोबर शितलादेवी हॉटेल समोर बोलत थांबलेला होता.त्यावेळी फिर्यादींचा चुलत भाऊ मनोज बडूरवाले हा खुशालसिंग याला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिला म्हणून, फिर्यादी व त्यांचे वडील असे मनोज यांच्या घरी जाऊन त्याला जाब विचारत विचारला.त्यावेळी वरील सर्व संशयित आरोपी यांनी मिळून फिर्यादी व फिर्यादी यांचे वडील,भाऊ यांना हाताने,लाथा बुक्क्यांनी,लोखंडी रॉड व पाईप व दगडाने मारहाण केली.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोसई गायकवाड हे करीत आहेत.

### उन्हाळ्यात ग्राहकांच्या वाढीव मागणीसाठी

## महावितरणकडून १,३४० दशलक्ष युनिट अतिरिक्त वीजखरेदी

✔ सुराज्य/सोलापूर

उन्हाळ्याच्या कालावधीत राज्यातील ग्राहकांची विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरणने मार्च, एप्रिल व मे महिन्यात लघुकालीन करार व पॉवर एक्सचेंजमधून एकूण १३४० दशलक्ष युनिट अतिरिक्त वीजखरेदी करून मागणीनुसार पुरवठा करण्यात यश मिळविले आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.

उन्हाळ्यातील वाढत्या मागणीचा अंदाज घेऊन महावितरणने ग्राहकांना जादा वीज पुरवठ्याचे नियोजन करण्याची सूचना उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार महावितरणने अधिकची वीज खरेदी केली. परिणामी मागणीनुसार वीज पुरवठा करता आला आणि कुठेही भारनियमन होऊ दिले नाही.

उन्हाळ्यामुळे महावितरणच्या विजेच्या मागणीत वाढ झाली आहे. मार्च व एप्रिल महिन्यात विजेची कमाल मागणी अनुक्रमे २४,९८३ मेगावॅट व २४,३२६ मेगावॅट इतकी नोंदली गेली आहे. मे महिन्यातील कमाल मागणी २४,०४७ मेगावॅट होती. मार्च महिन्यात ३०० मेगावॅट, एप्रिलमध्ये ४०० मेगावॅट आणि मे महिन्यात ४०० मेगावॅट विजेच्या खरेदीसाठी लघुकालीन



करार करण्यात आले होते. या माध्यमातून या तीन महिन्यात महावितरणने ६५६ दशलक्ष युनिट अतिरिक्त वीजखरेदी केली. उन्हाळ्यातील वाढती वीज मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरणने पॉवर एक्सचेंजच्या सुविधेचाही लाभ घेतला आहे. विजेची उपलब्धता आणि दर ध्यानात घेऊन नियमितपणे पॉवर एक्सचेंजवरून वीज खरेदी केली जाते. महावितरणने पॉवर एक्सचेंजवरून मार्च महिन्यात १३९ दशलक्ष युनिट तर एप्रिल महिन्यात ३२९ दशलक्ष युनिट वीज खरेदी केली. मे महिन्यातील वीज खरेदी २१६ दशलक्ष युनिट इतकी होती. महावितरणने पंजाब व इतर काही राज्यांसोबत केलेल्या पॉवर बँकिंग कराराच्या आधारे मार्चमध्ये ५०० मेगावॅट, एप्रिलमध्ये ४५० मेगावॅट आणि मे महिन्यात २५० मेगावॅट वीज उपलब्ध केली. पॉवर बँकिंग करारात महावितरणकडे अतिरिक्त असलेली वीज अन्य राज्यांना दिली जाते व त्या बदल्यात महावितरणला गरज असेल त्यावेळी त्यांच्याकडून वीज घेतली जाते. विजेची गरज पूर्ण करण्यासाठी कोयना जलविद्युत प्रकल्पातून गरजेनुसार १९०० मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती करून पुरवठा करण्यात येत आहे.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**अउदा पॅक विभाग-३, सोलापूर कार्यालयाच्या विद्युतीकरणाच्या कामाबाबत**

अउदा पॅक विभाग-३, सोलापूर येथे विद्युतीकरणाच्या कामाची आवश्यकता असून आमची कार्यालयीन चौकशी क्र. ३२७ दि. ०१.०६.२०२३ असून इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सिलबंद लिफाफ्यात दि. ०९.०६.२०२३ संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदे बाबतची संपूर्ण माहिती www.mahatransco.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
दुरध्वनी क्र. ७४४७४४०८५४

सही/-
कार्यकारी अभियंता
पॅक विभाग-३, सोलापूर

023/SMC-GAD 2023 SMC-11011/27/2023-SMC-GAD

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन डॉ.आंबेडकर चौक, रेल्वेलाईन्स, सोलापूर - ४१३००१.
**सामान्य प्रशासन विभाग**
दुरध्वनी क्रमांक - ०२१७-२७४०३००.
(ई-मेलआयडी– smccommissioner@yahoo.com)
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-१/९२ दि.१/६/२०२३

**जाहिर प्रसिद्धीकरण**

सोलापूर महानगरपालिका संगणक विभागास आवश्यक असलेली तांत्रिक पदे तसेच विविध कार्यालयास आवश्यक असलेले कुशल, अर्धकुशल व अकुशल मनुष्यबळ पुरविणेकरीता प्रति कामगार (कुशल, अर्धकुशल व अकुशल) सेवक पुरविणेकामी सोलापूर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरावर सर्व्हिस चार्जेस आधारे मान्यता प्राप्त पुरवठादाराकडून दर मागविणेत येत आहेत.

सदर निविदेच्या शर्ती व अटी निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in व www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर दि.२/६/२०२३ पासून पहावयास उपलब्ध आहे.
Tender- ID_2023_911034_1

सही/-
(शीतल तेली-उगले, भा.प्र.से.)
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका



## उत्तर तालुका युवा सेनाच्या उपप्रमुखपदी अनिकेत लोंढे

**उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील बेलाटी येथील अनिकेत महादेव लोंढे यांची बाळासाहेब शिवसेनेच्या युवासेना उत्तर तालुका उप- प्रमुखपदी सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख शिवाजी सावंत यांच्या हस्ते,सोलापूर जिल्हा प्रमुख अमोल शिंदे,शहराध्यक्ष मनोज शेजवाल यांच्या प्रमुख उपस्थित निवडीचे पत्र देण्यात आले.यावेळी सचिव जावेद पटेल, उपजिल्हा प्रमुख राजकुमार शिंदे, उपजिल्हा प्रमुख संजय सरवदे, उपजिल्हा प्रमुख हरिभाऊ चौगुले, उपजिल्हा प्रमुख नाना मस्के, तालुका प्रमुख सुधीर गोरे, युवा नेते उमाकांत करंडे, शशी शिंदे, संतोष वाघमारे, अजय लोंढे, विकी वाघमारे, किशोर गायकवाड, दीपक वाघमारे, करण लोंढे, संजय गायकवाड, महेश वाघमारे उपस्थित होते.

## विवाहितेचा छळ करत पैशाची मागणी ; पतीसह चौघांवर गुन्हा

**सोलापूर** : घरातील सासरकडील मंडळींनी संगणमत करून विवाहितेच्या अंगावर धावून येऊन मोलकरणी सारखी वागणूक देऊन तिला शारीरिक व मानसिक त्रास देत तुझ्या आई-वडिलांकडून लग्नामध्ये तीन तोळे सोने राहिले होते ते घेऊन ये नाहीतर तीन लाख रुपये घेऊन ये अन्यथा तुला नांदविणार नाही. असे म्हणत होण्याची मागणी करून छळ केला आहे.ही घटना दि.२९ संप्टेंबर २०२० ते १२ एप्रिल २०२३ दरम्यान फिर्यादीच्या सासरी घडली.याप्रकरणी मनाली अनिल गायकवाड (वय-२७,रा. संजय नगर,कुमठा नाका) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती अनिल शिवाजी गायकवाड,सुवर्णलता शिवाजी गायकवाड,शिवाजी सोपान गायकवाड,प्रथम गायकवाड (सर्व रा.गरीबी हटाव झोपडपट्टी नंबर १,विजापूर रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक शेळके हे करीत आहेत.

## 'तू माझी नाही तर कोणाची नाही' म्हणत महिलेवर चाकू हल्ला

**सोलापूर** : तू माझी नाही तर कोणाची नाही असे म्हणून महिलेच्या घरात घुसून शिवीगाळ करून तिच्या व मुलाच्या डोळ्यात चटणी टाकून महिलेच्या पोटात व छातीवर चाकूने वार करून गंभीररित्या जखमी केल्याप्रकरणी एकाजणाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० मे रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर बाळे येथे घडली.याप्रकरणी रूपाली किशन पाटोळे (वय-३२,रा. शिवाजीनगर बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून किशन रंगनाथ पाटोळे (रा.शिवाजीनगर बाळे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोसई.भोईटे हे करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीसोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल

**सोलापूर** : अल्पवयीन मुलीचा पिच्छा करून तिच्या सोबत काढलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी तरुणावर पोक्सोन्वये गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी कृष्णा ज्ञानदेव चंदनशिवे (वय-२४,रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. पीडित तरुणी ही १७ वर्षाची असून आरोपी कृष्णा हा तिचा पाठलाग करत होता.याबाबत पीडितेने आईवडिलांना सांगितल्यानंतर पीडितेच्या आई वडिलांनी आरोपीच्या नातेवाईकांना सांगितले होते. त्यानंतरही आरोपीच्या वागणुकीत बदल झाला नाही.शिवाय त्याने पीडितेशी गोड बोलत तिचा पाठलाग सुरू केला.शिवाय तिच्या सोबत काढलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले. अशा आशयाची फिर्याद पीडितेच्या आईने दिली आहे.या फिर्यादीवरून आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## दारू पिण्यास पैसे दे म्हणत डोक्यात घातला फरशीचा तुकडा

**सोलापूर** : शेतकी फार्म मित्र नगर शेळगी येथे फिर्यादी अविनाश राम जाधव (वय-३०,रा.मित्र नगर,शेळगी हे बसण्यासाठी गेले होते.त्यावेळी सोन्या नावाचा इसम तेथे आला व फिर्यादी यांना दारू पिण्यासाठी पैसे मागू लागला. त्यावेळी फिर्यादी यांनी माझ्याकडे पैसे नाहीत असे समजावून सांगत असताना सोन्या व शुभम तसेच इतर दोन अनोळखी इसमाने फिर्यादी यांना शिवीगाळ करत हाताने व लाथाबुक्क्यांनी यांनी मारहाण केली. तसेच सोन्या याने व इतर दोघांनी फिर्यादी यांना पकडून ठेवून शुभम याने तेथेच पडलेला फरशीचा तुकडा फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.याप्रकरणी अविनाश जाधव यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून सोन्या,शुभम (रा.सोलापूर) व इतर दोन अनोळखी इस्माविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास सहाय्यक फौजदार दुधाळे हे करीत आहेत.

## पूर्वी झालेल्या वादातून तरुणावर कोयत्याने हल्ला

**सोलापूर** : वर्षभरापूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून तरुणाला कोयता व चाकूने मारून जखमी केल्याप्रकरणी चौघांवर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी केतन विजय माने (वय-२४, रा. हत्तूरे वस्ती) यांनी फिर्याद दिली आहे.ही घटना ३१ मे रोजी रात्री हुतात्मा चौक परिसरात घडली.फिर्यादी केतन यांचे आरोपींसोबत किरकोळ कारणावरून वर्षभरापूर्वी वाद झाला होता.हा वाद तेव्हाच मिटला होता.पण वादाचा राग मनात धरून आरोपींनी ३१ मे रोजी रात्री हुतात्मा चौक परिसरात फिर्यादी केतन यांना कोयता व चाकूने व त्यांच्या भाऊ शुभम यास मारून जबर जखमी केले.याप्रकरणी केतन यांच्या फिर्यादीवरून ऋषी हराळे (वय-२२),प्रवीण हराळे (वय-२०,दोघे रा.नई जिंदगी),विशाल बहिरगोंडे ऊर्फ खिलाडी (वय-२४,रा.एमआयडीसी,अक्कलकोट रोड), समर्थ जाधव ऊर्फ सॅम (वय-२०,रा.जुनी मिल चाळ) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा तपास पोसई अश्विनी काळे हे करीत आहेत.

### जि. प. समाजकल्याणने तंबाखू विरोधी दिनाची केली 'ऐशी-तैशी'

# नियोजन बैठक तीन तासाची कार्यक्रम गुंडाळला दीड तासात

**सुराज्य/सोलापूर**

**शासनाचे परिपत्रक येताच... जागतिक तंबाखू विरोधी दिन विविध कार्यक्रमांनी साजरा करा. लागलीच जि. प. च्या समाजकल्याण विभागाने सर्वसंबंधितांची बैठक बोलाविली.... ही बैठक तब्बल तीन तास चालली... कार्यक्रयाचे नियोजन ठरले. आणि बुधववारी केवळ दीड तासात हा कार्यक्रम उरकून समाजकल्याण विभागाने धन्यता मानली.**

राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण व मानसिक आरोग्य कार्यक्रम तसेच जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त दंत व मानसिक आरोग्य तपासणी शिबिर जि. प. च्या प्रागंणात आयोजित करण्यात आले होते. या शिबिराची जनजागृती न झाल्याने त्याला कुणाचाच प्रतिसाद मिळाला नाही. अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता, झाली बऱ्यापैकी तपासणी, एवढेच उत्तर मिळाले.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनावेळी तर जि. प. कर्मचाऱ्यांना त्यांच्या खात्यात जाऊन त्यांचे चालते काम थांबवून बोलावून आणण्याची पाळी आली.

या कार्यक्रमाप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी तंबाखूचे सेवन करून कुठेही थुंकू नये याबाबत सूचना केल्या. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर धनंजय पाटील यांनीही तंबाखू सेवन विरोधात मार्गदर्शन केले.

तंबाखूचे दुष्परिणाम याबद्दल जनजागृती व्हावी यासाठी निबंध आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना संदीप कोहिनकर, डॉक्टर धनंजय पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर यांच्या हस्ते प्रथम द्वितीय व तृतीय आलेल्या विजेत्यांना सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. उपस्थितांना जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त शपथ देण्यात आली. त्यानंतर दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय येथील तपासणी वाहनाचे उद्घाटन कोहीनकर यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोनिका हिरेमठ, सच्चिदानंद बांगर, शशिकांत ढेकळे, स्वाती गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून तंबाखू विरोधी नियंत्रण, मानसिक आरोग्य, दंत आरोग्य, जिल्हा परिषद परिसर स्वच्छता आणि आरोग्य दिन आणि तंबाखू विरोधी बॅनर जनजागृती आदी महत्त्वाचे उपक्रमांवर जनजागृती करण्यात येणार होते. याबाबत जिल्हा परिषद समाज कल्याण खात्याने भरगच्च कार्यक्रम होणार असल्याचे दोन दिवस अगोदर याबाबत जाहीर केले होते. पण ते नावालाच उरले.




### शासनाच्या सूचना आल्या म्हणून घेतला कार्यक्रम

या कार्यक्रमात अनेक शिबिरे घ्यायचे ठरले असे असताना शिबिरात किती लोकांनी सहभाग नोंदविला. किती लोकांना याचा फायदा झाला, किती गरजूंना मानसिक आरोग्य शिबिराचा फायदा झाला. या सर्व गोष्टी समाज कल्याण खात्याने लपवून ठेवल्या आहेत. याबाबतची कुठलीही माहिती देण्यात आली नाही. केवळ शासनाच्या सूचना आल्या म्हणून कार्यक्रम नावाला राबवायचे आणि पुन्हा त्याकरिता आलेला पैस खर्च करायचा एवढेच यातून निष्पन्न झाले.

### गाळयुक्त शिवार योजना

## लोकमंगल फाउंडेशनतर्फे एकरुख तलावातील गाळ काढण्यास सुरुवात

**सुराज्य/सोलापूर**

मृद व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन व लोकमंगल फाऊंडेशन अंतर्गत गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत गुरुवारी एकरुख तलावातील उळे हद्दीतील गाळ काढण्याचे कामाचा शुभारंभ उत्तर सोलापूर तालुक्याचे तहसीलदार सैफन नदाफ यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना तहसीलदार नदाफ म्हणाले की, की शेतकऱ्यांसाठी अतिशय चांगली योजना आहे. यामुळे पाण्याची पातळी वाढते आणि काढलेल्या गाळाचाही फायदा होतो. यापूर्वी २०१५ मध्ये शासन फक्त जेसीबीच्या डिझेलचा खर्च देत होते. मात्र आता वाहतुकीचा ही खर्च मिळत आहे. शासन हे गतिमान झाले आहे, याचा पुरेपूर फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा.

यावेळी मंडळ अधिकारी सुखदेव पाटील, लोकमंगल फाऊंडेशन चे संचालक प्रल्हाद कांबळे, शशिकांत थोरा, मारुती तोडकर, अनुप कुलकर्णी, दिपाली कोठारी तसेच धर्मराज इंटरप्रायजेसचे पप्पू घोडके,के के कंपनीचे कैलास कांबळे यांच्या हस्ते तसेच श्री.उत्तम शिंदे,मनोज गुंड, प्रवींण कासार, माऊली डांगे,दत्तात्रय खंडागळे, मनोज जी बचुटे,संजय पौळ,संजय शिंदे,महादेव डांगे, दीपक शिंदे, राहुल गुंड, नाना गोवर्धन, सतीश शिंदे, विष्णु शिंदे, अनिल कोले, गणेश खंडागळे, विजयकुमार खंडागळे,धर्मराज गुंड, शिव कुंभार महादेव शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी पप्पू घोडके यांनी तहसीलदार नदाफ यांचा शाल व श्रीफळ देवून लोकमंगल फाउंडेशन आणि गावकऱ्यांच्या व शेतकर्यांचे वतीने सत्कार केला.

## अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन अत्याचार; तरुणाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : आइस्क्रीम खाऊन येते म्हणून घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पुणे, महाबळेश्वर अशा ठिकाणी नेऊन तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार करण्याचा प्रकार बुधवारी उघडकीस आला आहे. या प्रकरणी ऋषिकेश हणमंत टिंगरे या तरुणांविरुद्ध बाललैंगिक छळाचा गुन्हा नोंदला आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, यातील पीडित मुलगी ही शहरातील एका भागात वास्तव्याला असून, तिचे आईवडील मजुरी करून उपजीविका करतात. २५ मे रोजी तिने वडिलांकडून १०० घेऊन आइस्क्रीम खाऊन येथे म्हणून बाहेर पडली. शोधाशोध करूनही सापडली नाही म्हणून फौजदारी चावडी पोलिस ठाण्यात मुलीला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार मुलीच्या आईने दिली.

## वाढदिवसासाठी जमले, वादातून दोन गटात तुफान हाणामारी

**सुराज्य/सोलापूर**

वाढदिवससाजराकरण्यासाठी जमल्यानंतर झालेल्या वादातून दोन गटात ३१ मे रोजी रात्री तुफान हणामारी झाली. यात दोन्ही गटातील तीन ते चार जण जखमी झाले असून यात परस्पर विरोधी फिर्यादीवरून बारा जणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पहिल्या गटातील फिर्यादी सलमान जैनोद्दीन नदाफ (वय-२०, रा.कुर्बान हुसेन नगर) यांच्या नुसार ते मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी परिसरात गेले होते. तेव्हा लहान मुलांचे भांडण सुरू होते.त्यावेळी आरोपी जमीर रसुल शेख,अमीन जमीर शेख, मोहमद जावेद खान व इतर दोन ते तीन जणांनी मिळून फिर्यादीला काठीने व दगडाने मारून जखमी केले. अशा आशयाची फिर्याद नदाफ यांनी दिली आहे. तर दुसर्या गटातील जमीर रसूल शेख ( वय ४८, रा. कुर्बान हुसेन नगर) यांच्या फिर्यादीवरून फिर्यादी जमीर व त्यांचा मुलगा हा वाढदिवस साजरा करण्यासाठी घटनास्थळी गेल्यानंतर आरोपींनी दगडफेक त्यांना करत जखमी केले,अशा आशयाची फिर्याद जमीर शेख यांनी दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून रमजान शेख, सलमान जैनु नदाफ,सैफन रफिक नदाफ,शब्बीर नदाफ व इतर दोन ते तीन मुले यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## सहयोग ब्राह्मण सेवा संघातर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

**सुराज्य/सोलापूर**

जुळे सोलापुरातील जुने संतोष नगर येथे सहयोग ब्राह्मण सेवा संघातर्फे सावरकर जयंती साजरी करण्यात आली.

प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक विश्वनाथ बेंद्रे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी हरिभाई देवकरण प्रशालेचे माजी प्राचार्य अशोक देशपांडे, सहयोग ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, सचिव अनिता कुलकर्णी, प्रकाश दिवाणजी, उदय कुलकर्णी, प्रा.अवधुत काटीकर,अजय कुलकर्णी, शशिकांत कुलकर्णी, प्रा. गणेश देशपांडे, भास्कर कुलकर्णी, विलास कौलगी, शिल्पा गोखले, सरिता कुलकर्णी, सुजाता देशपांडे या मान्यवरांसह संघाचे सर्व सभासद व समाजबांधव उपस्थित होते.यावेळी

प्रमुख वक्ते माजी प्राचार्य अशोक देशपांडे यांनी सावरकरांच्या समग्र साहित्याचा आढावा घेतला. सावरकरांच्या साहित्यापासून तरूणांनी स्फूर्ती घेण्याचे आवाहन केले. सोलापुरात सावरकरांचा पूर्णाकृती पुतळा उभा करण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल तसेच सलग सात वर्षे अंदमानाच्या सहली आयोजित केल्याबद्दल माजी नगरसेवक विश्वनाथ बेंद्रे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. श्री.बेंद्रे यांचेही यावेळी भाषण झाले. संघाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रकाश दिवाणजी यांनी सूत्रसंचालन केले. उदय कुलकर्णी यांनी आभार मानले.

## मत्ता व दायित्व सादर करा; अन्यथा पदोन्नतीसह सेवाविषयक लाभला लगाम

### महापालिका प्रशासनाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना सूचना

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर : सोलापूर महापालिकेतील अनेक कर्मचाऱ्यांनी सूचना करूनही मत्ता व दायित्व विवरण पत्र माहिती सादर केली नाही. ही माहिती सादर करणे बंधनकारक आहे. ही माहिती सादर न केल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसह इतर फायदे मिळणार नाहीत, अशा स्पष्ट सूचना महापालिका सामान्य प्रशासन विभागाने दिल्या आहेत.



सोलापूर महापालिकेतील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी हे मत्ता व दायित्व विवरणपत्र माहिती विहित वेळेत महापालिका प्रशासनाकडे सादर करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. महापालिका सामान्य प्रशासन विभागाकडे ही माहिती देणे आवश्यक आहे. सूचना व परिपत्रकाद्वारे वेळोवेळी कळविण्यात आले आहे तरीही काही कर्मचारी व अधिकारी हे याकडे कानाडोळा करतात. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मालमत्ता विषयक माहिती सादर करणे बंधनकारक आहे. प्रतिवर्षी दिनांक ३१ मार्चच्या अखेरचे मालमत्ता विवरणपत्र त्या त्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत सादर करणे बंधनकारक आहे. यासंदर्भात महापालिका सामान्य प्रशासन विभागाकडून सूचना करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, मत्ता व दायित्व विवरण पत्रामध्ये संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चल - अचल संपत्ती, जंगम मालमत्ता, बँक बॅलन्स, घर - बंगला, जमीन यासह मालमत्तेसंदर्भात संपूर्ण माहिती प्रशासनाला देणे आवश्यक आहे.

### अन्यथा हे फायदे मिळणार नाहीत !

सोलापूर महापालिकेतील विविध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मालमत्ता विषयक माहिती सादर करणे आवश्यक आहे. विहित वेळेत ही माहिती सादर न केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना सेवा विषयक फायदे मिळणार नाहीत. यामध्ये वार्षिक पगारवाढ, कालबद्ध पदोन्नती सह इतर फायदे मिळू शकणार नाहीत.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती सर्वत्र साजरी

**सुराज्य/सोलापूर**

**संभाजी आरमार**

राष्ट्रमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे मानवंदना देण्यात आली. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेवक चेतन नरोटे, संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, अनिकेत पिसे, अर्जुन पांढरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी अहिल्यादेवी होळकर यांच्या जयजयकाराच्या घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी बोलताना संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी अहिल्यादेवी होळकर यांनी देशातील असंख्य धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला विशेष म्हणजे हिंदू धर्मीयांच्या दृष्टीने अति पवित्र असणाऱ्या श्री काशी विश्वेश्वराच्या मंदिराचा देखील जीर्णोद्धार करून हिंदूंच्या धार्मिक भावनांची जपणूक करण्यासोबतच जनतेच्या हिताचा कारभार प्रत्यक्षात उतरविला असे प्रतिपादन केले. याप्रसंगी संभाजी आरमारचे प्रदेश संघटक प्रकाश डांगे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हाप्रमुख गजानन जमदाडे, सतीश भोसले, शहरप्रमुख सागर ढगे, मल्लिकार्जुन पोतदार, विकी ठेंगले, सोमनाथ मस्के, विठ्ठल वाघमोडे, बाळासाहेब वाघमोडे, निलेश गर्जे, नवनाथ मस्के, संगप्पा म्याकल गिरीष जवळकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

**माढ्यात अभिवादन**

**माढा** : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्याचे शिवसेना पक्षाचे संपर्कप्रमुख प्रा शिवाजीराव सावंत माजी समाज कल्याण सभापती शिवाजीराजे कांबळे नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे नगरसेवक आजिनाथ आप्पा माळी शहाजी आण्णा साठे सभापती विकास भैय्या साठे नितीन नाना व नितीन( ताना) साठे अशोक थोरात शबाना बागवान माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद आप्पा कानडे गुरुराज कानडे शंभूराजे चवरे भाजपा तालुका सरचिटणीस मदन मुंगळे माढा भाजपा शहर अध्यक्ष प्रा बंडू कांबळे शिवसेनेचे माढा शहराध्यक्ष भैया खरात अमोल खरात स्वप्निल खरात अरविंद खरात मयूर खरात शिवाजी दादा कांबळे शिवाजी दादा माने क्रांती माने सुरेश खरात समीर सापडणेकर बालाजी नाईकवाडे सुरेश पारखे सागर गडदे सुमित सलगर गणेश वाघमोडे विशाल चांगल व शहरातील इतर सर्व मान्यवर उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा बंडू कांबळे व अमोल खरात यांनी केले आभार प्रदर्शन मोहन देवकते यांनी केले



**नातेपुते अहिल्यादेवी चौक**

**नातेपुते** : नातेपुते अहिल्यादेवी चौक येथे महिलांनी व लहान मुलांनी मिळून राजमाता पूण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. यावेळी ज्योत्स्ना उराडे, राधिका लाळगे, सूरेखा लाळगे, रूपाली लाळगे, अनूराधा उराडे, रोहीणी लाळगे, सुनिता उराडे, बिना डफळ, अंजना लाळगे, दिपाली पिसे, सार्थक ठोंबरे, पृथ्वी पिसे, चैतन्य उराडे, वेदांत लाळगे, अथर्व उराडे, साइराज उराडे, अक्षय ठोंबरे, आनंद भूसे, श्रेयस ठोंबरे, ओम लाळगे उपस्थित होते.

**कोन्हाळी ग्रामपंचायत**

**अक्कलकोट** : कोन्हाळी ग्रामपंचायत येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ ज्योती उण्णद, श्रीमंती निलाबाई राम गायकवाड (अंगणवाडी सेविका) या दोन महिलांना पुरस्कार देण्यात आली. यावेळी सरपंच चिदानंद उण्णद व उपसरपंच प्रतिका बनसोडे, ग्रामसेवक अभिमन्यू ताड, प्रिया कुलकर्णी, मल्लिनाथ ढब्बे, रवि गायकवाड, धर्मराव हेबळे, शिवानंद माळी, वैशाली गायकवाड, सुजाता माळी, नागबाई पाटील, मलकप्पा माळी इत्यादी उपस्थित होते.

**जी.एम संस्था**

**सोलापूर** : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त जीएम मागासवर्गी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने चार हुतात्मा चौक येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास माजी खासदार धर्मांना सादुल व जी.एम मागासवर्गी बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थापक बाळासाहेब वाघमारे, जीएम संस्थेचे सल्लागार राजाभाऊ हौशेट्टी, माजी नगरसेवक सुनिल कटके, शशिकांत ऊर्फ पप्पु गायकवाड, संतोष वाकसे, अश्विन सोनवणे, मुकेश भैरी, मुकेश सोनवणे, दत्ता शिंदे, नरेंद्र शिंदे, अभि क्षीरसागर, अजय कोळेकर, अनिकेत काकडे, रघुराज बनसोडे आझर शेख यशराज बनसोडे सनि दणाणे आदी उपस्थित होते.

# दूध दरासाठी वेळापूर येथे रास्ता रोको

✔ सुराज्य/वेळापूर

**खासगी दूध संघाकडून दुधात कपात करून जवळपास तीन ते पाच रुपयांनी दुधाचे दर कमी झालेले आहेत. शेतकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. दुधाचे दर पूर्ववत करण्यासाठी वेळापूर येथे स्वाभिमानी शेतकरी संघटना माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर माने- देशमुख यांच्यावतीने वेळापूर येथील अकलूज- सांगोला रस्त्यावर अर्धनारी नटेश्वर मंदिर समोर रस्ता रोको करण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या आंदोलनास विविध शेतकरी संघटना , पक्ष यांच्यावतीने पाठिंबा देण्यात आला. या रस्ता रोकोमुळे रस्त्याच्या दोन्ही बाजुला मोठ्या संख्येने वहानांच्या रांगा लागल्या होत्या.**

## दुधाचा पूर्ववत दर न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा शेतकरी संघटनांचा इशारा



यावेळी गोपाळ घारगे, मदनसिंह जाधव, काकासाहेब जाधव, राहुल बिडवे, साहिल आतार, दत्ता भोसले, अजित बोरकर ,कमलाकर माने देशमुख, दूध उत्पादक शेतकरी विनोद मेटकरी आदींनी खाजगी दूध संघाच्या दूध दर कपातीच्या निर्णयामुळे राज्यातील शेतकरी बैचन झाला आहे, शेतकऱ्यांची आर्थिक घडी कोलमांडण्याच्या मार्गावर आहे. एका बाजूला पशुखाद्याचे दर, खतांचे दर, इंधनाचे दर वाढत आहेत. मात्र शेतकऱ्यांना हमखास मिळणाऱ्या उत्पादनावर कात्री लावली जात आहे. पशुखाद्य मात्र दर वाढताना शंभर रुपये नि वाढतात आणि एकदाही कमी होत नाहीत हा फरक कशासाठी याबाबत रस्ता रोको वेळी विचार मांडून जर दुधाचे दर पूर्ववत झाले नाही तर सर्व शेतकरी संघटना एकत्रित येऊन तीव्र आंदोलन छेडल असा विचार व्यक्त करुन यावेळी इशारा देण्यात आला .

यावेळी वेळापूर मंडल अधिकारी विलास रणसुभे व वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

रस्ता रोकोला स्वाभिमानी शेतकरी संघटना माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर माने देशमुख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मदनसिंह जाधव, स्वाभिमानी जिल्हा युवा आघाडी जिल्हा उपाध्यक्ष दत्ता जाधव, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर, स्वाभिमानी पक्षाचे शिवाजीमामा चव्हाण , स्वाभिमानी माळशिरस विधानसभा अध्यक्ष साहिल आतार , स्वाभिमानी संघटना तालुका उपाध्यक्ष शिवप्रसाद देशपांडे, स्वाभिमानी युवक संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित कोडग, वेळापूर शहराध्यक्ष सचिन पवार, बहुजन मुक्ति पार्टीचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब जाधव, रयत क्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल बिडवे, वंचित बहुजन आघाडीचे गोपाळ घारगे, महेंद्र साठे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष युवराज मंडले, पिंनू येडगे, जब्बार आतार, अहिल पठाण, दादा काळे, सचिन बोरकर, देसाई माने देशमुख , रणजीत माने देशमुख, ज्ञानेश्वर माने देशमुख ,गोपाळ शिरसागर, कल्याणराव माने देशमुख, काका कागदे, शिवाजी माने देशमुख , अमोल माने देशमुख, साहिल माने देशमुख, सचिन माने देशमुख, दूध संकलन केंद्राचे चेअरमन बाळासाहेब आडत, बाळासाहेब माने देशमुख, बुवा शिंदे, यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते ,विविध शेतकरी संघटना व पक्षाचेपदाधिकारी, शेतकरीवर्ग, रस्ता रोको ला उपस्थित होते.



## लताबाई गोतसुर्वे, शोभा माने यांचा सन्मान

✔ **अक्कलकोट** : आचेगांव ता. दक्षिण सोलापूर ग्रामपंचायतीच्या वतीने शासनाच्या आदेशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त ग्रामपंचायत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दोन कर्तबगार महिला म्हणून लताबाई अशोक गोतसुर्वे व शोभा तुळजाराम माने यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

पुरस्कर्त्यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ व शासनाने ठरवून दिल्या नुसार रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. सदर पुरस्कार महिला व बालकल्याण माध्यमातून देण्यात आले. यावेळी सरपंच विश्रांती पाटील, शावरसिद्ध पाटील, तंटामुक्त अध्यक्ष भगवान गोतसुर्वे, पोलीस पाटील प्यारन मुल्ला,उपसरपंच रफिक मुल्ला, महिबूब पाटील, नागप्पा कांबळे ताजोद्दीन बिराजदार, इरफान पटेल,ग्रामपंचायत सदस्या श्रीम मंगल गोतसुर्वे, गौतमी बलवान गोतसुर्वे, रेश्मा महिबूब पाटील, शांताबाई शिलेणी, सावित्रा कांबळे रायप्पा जळगोडर, सागर कोळी आदिसह गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून आपली सेवा बाजावून सेवा निवृत्त झालेबद्दल पाणीपुरवठा कर्मचारी शेकू बिराजदार, कारकून सिद्राम नवगिरे, सफाई कामगार शावरसिद्ध भणजे यांचा सेवा निवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शावरसिद्ध पाटील यांनी केले.



## अंबिका पाटील यांना पुरस्कार


✔ **अक्कलकोट** : होटगी गावच्या अंबिका पाटील यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागात महिला सक्षमीकरण, स्वयंरोजगार व महिलांच्या आरोग्य विषयात अंबिका पाटील यांचे भरीव काम आहे, स्वप्नपूर्ती महिला सामाजिक संस्थेच्या माध्यमातून त्या दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये महिलांसाठी कार्य करत आहेत. दक्षिण सोलापूर मधील महिलांना शिलाई मशीन ट्रेनिंग व जॉबवर्क, सॅनेटरी नॅपकिन तयार करणे, कापडी पिशव्या करण्याचे ट्रेनिंग असा विविध ट्रेनिंगच्या माध्यमातून महिलांना रोजगार निर्माण करून दिला जातो. पुरस्कार वितरण सोहळ्यसाठी दक्षिण सोलापूर पंचायत समिती उपसभापती रामप्पा काका चिवडशेट्टी, दक्षिण सोलापूर चे बीडीओ सरपंच निर्मला गायकवाड उपसरपंच असीम शेख पोलीस पाटील रेणुका इंगळे,व ग्रामपंचायत सदस्य, भीमाशंकर पाटील,मार्तेश पाटील, अप्पु फताटे काका, दत्तात्रय घोडके, जेष्ठ नागरिक लक्ष्मण कुभार, विठ्ठल लांडगे,सुभाष कुभांर, काम अण्णा लांडगे , महिलावर्ग , युवक, जेष्ठ नागरिक गावकरी उपस्थित होते.



## राणी सुरवसे, भौरम्मा तावरखेड यांना पुरस्कार

✔ **अक्कलकोट** : गोगाव ग्रामपंचायतीच्यावतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल गावातील दोन महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोगावचे सरपंच वनिता सुरवसे होत्या.प्रमुख उपस्थिती उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक दयानंद चोळे,ग्रामसेवक विक्रम घाटे, कल्लप्पा बनसोडे हे होते. यावेळी प्रतिमा पूजन ज्येष्ठ सदस्य प्रदीप जगताप व पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राणी विकास सुरवसे यांना सरपंच सौ वनिता सुरवसे यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले व ग्रामीण भागातील अशिक्षित महिलांना आरोग्य विषयक जनजागृती करून त्यांना आरोग्य विषयक माहिती देऊन सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सौ भौरम्मा तावरखेड यांचा सदस्या सौ महादेव मुलगे यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौविण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका तेजाबाई गुरव,भाग्यश्री सोनकवडे यांच्यासह बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रम सूत्रसंचालन व आभार उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले.

## अकलूज येथे अहिल्यादेवी होळकर जयंती



✔ **अकलूज** : अकलूज परिसर धनगर समाज उन्नती मंडळ यांच्यातर्फे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, आमदार राम सातपुते, भाजपा नेते धैर्यशील मोहिते पाटील, किशोरसिंह माने पाटील, अकलूज चे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील,अकलूज नगरपरिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी दयानंद गोरे,अकलूज पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक रन्तदिप गायकवाड,हंसराज माने पाटील व विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अकलूज परिसर धनगर समाज उन्नती मंडळांचे अध्यक्ष लक्ष्मीकांत दगडू वाघे ,उपाध्यक्ष निलेश ठोंबरे, दिलीप तात्या होनमाणे,रणजीत सुसलादे ,संजय पाडोळे , अज्ञानराव मोटे, सुधाकर पोटे ,नागेश्वर पोटे, सचिन सरगर,स्वप्निल होनमाणे, अमोल राजगे ,रूपेश पोटे ,शिवाजी घोडके, अजिंक्य लाडे, दिग्विजय घोडके ,अभिषेक घुले, नागेश मळगे ,सनी भगत ,सागर देवकाते, राहुल माने ,संजय पिसे, देविदास शिंदे ,संतोष राजगे, गणेश सावळकर ,महादेव देवकाते ,रोहन पांढरे यांनी व इतर अनेक सामाज बांधवांनी सहकार्य केले.

# 'शासन आपल्या दारी' उपक्रम दरवर्षी राबविण्याची गरज : वाळुंज

✔ सुराज्य/अक्कलकोट




शासनाच्या विविध योजना सामान्य नागरिका पर्यंत पोहचवण्यासाठी तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालय वरील ताण कमी करण्यासाठी 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम दरवर्षी राबविणे गरजेचे असल्याचे मत मुख्याधिकारी अतिष वाळुंज यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

दुधनी शहर व परिसरातील सर्वसामान्य जनतेची कामे स्थानिक पातळीवर व्हावीत, तसेच जनतेला विविध योजनांचा लाभ लवकर मिळावा यासाठी आज तहसिल कार्यालय अक्कलकोट व दुधनी नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दुधनी नगरपरिषद सभागृहात 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्याधीकारी अतिष वाळुंज हे बोलत होते. यावेळी स्वामी समर्थ कारखान्याचे नुतन संचालक महेश पाटील, माजी नगरसेवक अतुल मेळकुंदे, मंडलाधिकारी धर्मसाले, कार्यालयीन अधिकारी चिदानंद कोळी, कर निरीक्षक आर. आर. गुंड, ईरय्या पुराणिक, बसवराज हौदे, बाबा टक्कळकी, तसेच कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्याधिकारी अतिष वाळुंज म्हणाले की, आज शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध विभागाच्या माध्यमातून कमीत कमी कागदपत्रे, जलद मंजूरी व शासकीय निर्धारित शुल्कात नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळाला आहे. आज १५० पेक्षा अधिक लाभार्थ्यांनी 'शासन आपल्या दारी' या योजनेचा लाभ घेतल्याचे मुख्याधिकारी अतिष वाळुज यांनी सांगितले. यावेळी कृषि विभागाच्या माध्यमातून तीन लाभार्थ्यांना जागेवरच ट्रॅक्टर वाटप करण्यात आले. तसेच विविध शासकीय दाखले मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यापूर्वीच मुख्याधिकारी अतिष वाळुंज व दुधनी नगरपरिषदेच्या वतीने जास्तीत जास्त नागरिकांनी 'शासन आपल्या दारी' या शिबिराचे लाभ घेण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत आज शेवटच्या दिवशी दुधनी शहर व परिसरातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती.

## अश्विनी हॉस्पिटलमधून महिला डॉक्टरचा टॅब पळवला

✔ सुराज्य/सोलापूर

अश्विनी हॉस्पिटल मधील ओपीडी मध्ये असलेल्या टेबलावर ७५ हजार रुपये किंमतीचा टॅब अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे.

ही घटना दि.२६ ते २९ मे दरम्यान घडली.याप्रकरणी डॉ. रूचा राहुल औरंगाबादकर (वय-२६,रा.सम्यक अपार्टमेंट,जुना विठ्ठल मंदिर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोसई माळी हे करित आहे.

# शनिवारी सांगोल्यात संविधानिक धार्मिक स्वातंत्र्य हक्क परिषद

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला येथील पंचायत समितीच्या बचत भवन मध्ये सेक्युलर मुव्हमेंट व सेक्युलर आर्ट मुव्हमेंटच्या वतीने शनिवार दि. ३ जून रोजी पंचायत समिती बचत भवन येथे संविधानिक धार्मिक स्वातंत्र्य हक्क परिषदेचे आयोजन केले असल्याची माहिती सेक्युलर मुव्हमेंटचे कार्याध्यक्ष भरत शेळके यांनी दिली.

कार्यक्रमास सेक्युलर मुव्हमेंटचे अध्यक्ष प्रा. गौतमीपुत्र कांबळे (आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ विचारवंत ), ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे, सेक्युलर मुव्हमेंटचे जनरल सेक्रेटरी प्रा. डॉ. भरत नाईक कोल्हापूर, तसेच इतर मान्यवर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ बाबासाहेब देशमुख, स्वराज इंडियाचे ललित बाबर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रदिप मिसाळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यापूर्वी सेक्युलर मुव्हमेंटच्या वतीने मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबद आदी ठिकाणी परिषदा संपन्न झाल्या आहेत. सदर परिषदेला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला. त्यामुळे सोलापुर जिल्ह्यात देखील संविधानिक धार्मिक स्वातंत्र्य हक्क परिषद व्हावी असा विचार पुढे आल्याने सदर परिषदेच्या आयोजन केले असल्याची माहिती सेक्युलर मुव्हमेंटचे कार्याध्यक्ष भरत शेळके यांनी दिली. सदर परिषदेला सांगोला तालुक्यासह संपूर्ण जिल्हाभरातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सेक्युलर मुव्हमेंटच्या वतीने करण्यात आले आहे.



## झिंजेवस्ती येथे विविध उपक्रमांनी अहिल्यादेवी जयंती साजरी

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथे विविध उपक्रमांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी करण्यात आली. जयंती निमित्त क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये सुळेवाडी येथील संघाने प्रथम क्रमांक तर झिंजेवस्ती येथील सिध्दनाथ व महात्मा फुले क्रिकेट संघाने दुसरा क्रमांक तर पठाणवस्ती संघाने तिसरा क्रमांक पटकावला.

तर जयंती उत्सव समीतीच्या वतीने विविध क्षेत्रात दैदीप्यमान यश संपादन करणाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पोलीस खात्यात नव्याने भरती झालेल्या झिंजेवस्ती येथील करीष्मा अजिनाथ नरळे,मौला शेख,गणेश सुळे,सचिन मासाळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच राहुल सोलंकर यांची कृषी अधिकारी म्हणुन निवड तर झिंजेवस्ती गावचे सुपुत्र ॲड. विजय श्यामराव लेंगरे यांची सरकारी वकिल म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

झिंजेवस्तीचे माजी सरपंच विठ्ठलराव मदने - पाटील, विठ्ठल मदने, कुंडलीक कपने, पांडुरंग कचरे, माजी उपसरपंच सर्जेराव मदने, शयामराव गलांडे, हनुमंत राऊत, कुबेर कपने, रणजित मदने, अमोल मदने, विजय मदने, नबाजी मदने, हनुमंत मदने, मोहन मदने, अशोक शिंगाडे, सुधीर मदने, संग्राम मदने, भाऊ लेंगरे उपस्थित होते.



## पिलीव ग्रामपंचायतीतर्फे चार महिलांचा सन्मान

✔ सुराज्य/पिलीव

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्या प्रमाणे पिलीव ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील चार महीलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये अंगणवाडी सेविका सुशिला शंकर करडे, आशा वर्कर छाया माळी, सेवीका मोनाली भैस, सविता इंगळे या महिला पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्या.

यावेळी सरपंच नितीन मोहीते, जि प सदस्य गणेश पाटील, ग्राम पंचायत सदस्या शमशाद काझी,माजी सरपंच संग्राम पाटील, माजी उपसरपंच संजय आर्वे, महादेव जरग,कल्याण जावळे,राजेंद्र सिंग जामदार, अविनाश जेऊरकर, प्रा तुकाराम पडळकर, ग्रामविकास अधिकारी अनिल सावळजकर, प्रमोद भैस,संतोष पडळकर, अजित भैस,वैभव वगरे,दादासाहेब वगरे उपस्थित होते.

## शाळेसमोरून दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : डेअबेर निवास शाळा क्रमांक तीन येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एम.एच.१३.बीटी.३६८० ही चोरट्याने डुप्लिकेट चावीचा वापर करून चोरून नेली आहे.

ही घटना ३० ते ३० मे दरम्यान घडली. याप्रकरणी नम्रता श्रीनिवास मिठ्ठा (वय-२५,रा. न्यू पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल दुधाळ हे करीत आहेत.

# ज्योतीक्रांती परिषदेच्या वतीने उतानी घागर तोरण आंदोलन

✔ सुराज्य/मोहोळ




मोहोळ शहराचा विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करावा, या मागणी करता ज्योती क्रांती परिषदेचे प्रदेशाध्यक्ष रमेश बारसकर यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद कार्यालयावर उतानी घागर तोरण आंदोलन करण्यात आले.

मोहोळ शहराला पाणीपुरवठा करणारी सीना नदी दुधडी भरून वाहत असताना सुद्धा केवळ नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या नियोजना अभावी मोहोळ शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. भर उन्हाळ्यामध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे शहरातील माता भगिनींना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

मोहोळ शहराच्या यात्रा कालावधीमध्ये देखील अशाच पद्धतीने पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. तेव्हा सलग दहा दिवस बेमुदत चक्री आंदोलन करून मोहोळ शहराचा पाणीपुरवठा सुरळीत केला होता.

या आंदोलनादरम्यान बोलताना रमेश बारसकर म्हणाले कि, मोहोळ नगर परिषदेमध्ये लोक नियुक्त बॉडी असताना पाच वर्षाच्या कार्य काळामध्ये एकदाही पाण्यासाठी आंदोलन झालेले नाही परंतु मागील दोन वर्षांमध्ये प्रशासकाच्या हातामध्ये कारभार गेल्यापासून जनतेला सातत्याने वेगवेगळ्या कामासाठी आंदोलन करावी लागत आहे. नोकरशाहीतील कामगार यांनी जनतेची कामे प्रामाणिकपणे आणि वेळेत करणे गरजेचे आहे.

आज केलेले आंदोलन ची तीव्रता कमी आहे. परंतु नगरपरिषद प्रशासनाने याची दखल घेऊन जर का मोहोळ शहराचा पाणीपुरवठा सुरळीत केला नाही तर पुढील काळात याहीपेक्षा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करून मोहोळ शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करू अशा पद्धतीची भूमिका घेतली.

ज्याच्याकडे पैसे आहेत ते पाणी विकत घेऊ लागले आहेत. ज्याच्याकडे पैसे नाहीत अशा सर्वसामान्य लोकांना हातावरचे पोट असणारा वर्गाला बाहेर जावं लागत आहे अशी परिस्थिती केवळ नियोजन नसल्यामुळे शहरावर ओढवली आहे.

त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी ताबडतोब पाण्याचे नियोजन करून पाणी प्रश्न त्वरित सोडवावा, अशा प्रकारची मागणी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी अतुल क्षीरसागर, विनोद कांबळे, रियाज शेख, मंगेश पांढरे, आबासाहेब कांबळे, प्रकाश सोनवणे, जितेंद्र अष्टुळ, उमेश गोटे, शेखर माने, निलेश गरड, अजय कुर्डे, बाळासाहेब माळी, सागर अष्टुळ, अशोक सोलनकर, शशिकांत सनगर, राज गरड, ईशान खरकदारी आर्दीसह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे वृत्त

### मान्सूनच्या विलंबामुळे उष्णतेची लाट

**मुंबई** : यावर्षी ४ ते ५ जूनपर्यंत मान्सून केरळमध्ये पोहचण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे केरळमध्ये मान्सूनची प्रगती कशी होते यावर महाराष्ट्रात मान्सून कधी दाखल होणार हे निश्चित होणार आहे. त्यामुळे जूनमध्ये महाराष्ट्रात उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाने मान्सून अंदमान आणि निकोबार बेटे ओलांडून पुढे सरकला असला तरी यावेळी विलंब झाला असल्यामुळे दरवर्षी केरळमध्ये १ जूनपर्यंत दाखल होणारा मान्सून यंदा मात्र उशीरा पोहचणार आहे. त्यामुळे ९६ टक्के पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविल्यामुळे जूनमध्ये सरासरीच्या कमी पाऊस पडणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील नागरिकांना जुनच्या सुरुवातीचे काही दिवस उष्णतेचा सामना करावा लागणार आहे.



### पुण्यात दोन ठिकाणी आढळली अर्भके

**पुणे** : अनैतिक संबंधातून जन्माला आलेली दोन स्त्री अर्भके रस्त्यावर ठेवून देण्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. पालकत्वाची जबाबदारी घेण्यापासून पळ काढत संबंधितांनी अर्भकांना रस्त्यावर ठेवून त्यांच्या जीविताला धोका निर्माण केला. विमानतळजवळील खुळेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आणि येरवड्यातील कल्याणीनगर येथील पदपथावर या घटना उघडकीस आल्या. अर्भकांना रस्त्यावर टाकून दिल्याप्रकरणी नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

### स्वत:च्या छायाचित्राला वाहिली श्रध्दांजली

**अकोला** : स्वतःच्या छायाचित्राला श्रद्धांजली वाहून युवकाने गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवण खुर्द शेत शिवारात उघडकीस आली. मंगेश भाऊराव भगत (३२, रा. खरब ढोरे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चेतन नंदकिशोर सावरकर (२५, रा. शिवण खुर्द) मुलाबाळांसह राहत होता. तो शेती करीत होता. त्याने स्वतःच्या छायाचित्रावर श्रद्धांजली लिहिलेले स्टेटस् मोबाईलवर ठेवून शिवण खुर्द शिवारात झाडाला गळफास घेतला आणि आपले जीवन संपवले.

### व्हेल माशाची विक्री करणारी टोळी पकडली

**कोल्हापूर** : व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) अवैधरित्या विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या टोळीला गुरुवारी कोल्हापूर पोलिसांनी पकडले. आंबोली आजरा मार्गावर सापळा रचून त्यांच्याकडून तब्बल सुमारे ११ कोटी किमतीची व्हेल माशाची उलटी जप्त केले. याप्रकरणी अकबर याकुब शेख (५१), शिवम किरण शिंदे (२३), गौरव गिरीधर केरवडेकर (३३ ), इरफान इसाक मणियार (३६) आणि फिरोज भावुदिन ख्वाजा ( ५३ रा. कुडाळ तालुका, जि. सिंधुदुर्ग) या ५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### सहा वर्षात १५ हजार जणांचा मृत्यू

**मुंबई** : बेशिस्त वाहतूक, पादचाऱ्यांना चालण्यासाठी मोकळ्या पदपथांचा अभाव, रस्ते ओलांडताना केला जाणारा हलगर्जीपणा आदी कारणांमुळे राज्यात अपघातांची संख्या वाढत असून त्यात प्राण गमावणाऱ्या पादचाऱ्यांची संख्या हजारोंच्या घरात आहे. टाळेबंदी वगळता रस्ते अपघातांमध्ये पादचाऱ्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढते असून गेल्या सहा वर्षांत राज्यात १४ हजार ९७२ पादचाऱ्यांना अपघातांत जीव गमवावा लागला.

### कस्टम विभागाची मोठी कारवाई

**पुणे** : कस्टम विभागाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकास मिळालेल्या माहितीच्या आधारे 'मेथामफेटामीन' या अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या चार जणांना जेरबंद करण्यात आले आहे. सातारा ते लोणावळा यादरम्यान आरोपींचा पाठलाग करुन कस्टम पथकाने पाच कोटी रुपये किंमतीचे एक किलो मेथामफेटामीन अमली पदार्थ जप्त केल्याची माहिती कस्टम विभागाने बुधवारी दिली.

### दोन पिस्तुल आणि जिवंत काडतुसे जप्त

**पिंपरी** : चिंचवडमध्ये पिस्तुल विक्रीसाठी आलेल्या तिघांना भोसरी पोलिसांनी अटक केली आहे. दोन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे त्यांच्याकडून जप्त करण्यात आली. दिलीप प्रेमनारायण तिवारी, चंदनकुमार राय आणि सुगन कुमार राय अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यापैकी, दिलीप तिवारीवर वसई येथे चार जणांची हत्या आणि दोन जणांच्या हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हे दाखल आहेत. दुहेरी हत्ये प्रकरणी (डबल मर्डर) दुहेरी जन्मठेपेची शिक्षा मिळाली असून तो कोविड काळात पॅरोलवर बाहेर आला असून पुन्हा जेलमध्ये गेलाच नाही. अखेर त्याच्या मुसक्या भोसरी पोलिसांनी आवळल्या आहेत.

### राज्यात आता नव्या रिक्षांना बंदी

**पुणे** : आगामी काळात राज्यात नवीन रिक्षांना परवाना देणे थांबवले जाणार आहे. रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने यासाठी परिवहन विभागाने पावले उचलली आहेत. याबाबतचा प्रस्ताव परिवहन विभागाने केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालयाला पाठवला आहे. मंत्रालयाने हिरवा कंदील दिल्यास राज्यातील नवीन रिक्षांना परवाना देणे बंद होणार आहे. मंत्रालयाकडून लवकरच यावर निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर राज्यातील नवीन रिक्षांच्या परवान्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती परिवहन विभागातील सूत्रांनी दिली.

### बिहारमधून महाराष्ट्रातील बालकांची तस्करी?

**नाशिक** : जळगाव, मनमाड-भुसावळ विभाग रेल्वे पोलीस, सुरक्षा दल आणि सामाजिक संस्था यांच्या संयुक्त कारवाईमुळे दानापूर-पुणे एक्स्प्रेसमधून होणारी ५९ बालकांची तस्करी रोखण्यात यश आले आहे. भुसावळ आणि मनमाड रेल्वे स्थानकात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पाच संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून बालकांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. वेगवेगळ्या डब्यांमध्ये बसलेल्या आठ ते १५ वयोगटातील ३० मुलांना ताब्यात घेण्यात आले.

### मुलीच्या अपहरणामुळे आई-वडिलांची आत्महत्या

**नाशिक** : इगतपुरी प्रकरणात मुलीचे प्रियकरासोबत पलायन सहन न झाल्याने आई- वडिलांनी रेल्वेखाली आत्महत्या केल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात उघड झाले आहे. संशयित समाधान झनकरविरोधात मुलीचे अपहरण तसेच खताळे यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा सिन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खताळे यांच्या आत्महत्येमुळे संतप्त नातेवाईकांनी त्यांचा अंत्यविधी नेहमीच्या ठिकाणी न करता संशयिताच्या घरासमोर केला. त्यामुळे खताळे यांचे नातेवाईक तसेच ग्रामस्थांविरूध्द घोटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# १० वर्षात भारताचा चेहरामोहरा बदलला

## मॉर्गन स्टॅनलीच्या अहवालात मोदी सरकारचे कौतुक

**सुराज्य/नवी दिल्ली**

**मागील १० वर्षाच्या कार्यकाळात भारतात मोठे बदल झाले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत जागतिक पटलावर महत्त्वाचे स्थान मिळवण्याकडे वाटचाल करत असल्याचे अमेरिकन ब्रोकरेज कंपनी 'मॉर्गन स्टॅनली'ने आपल्या अहवालात नमूद केले आहे. या अहवालानुसार, भारत हा आशिया आणि जगाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडण्यासाठी सज्ज आहे.**



'इंडिया इक्विटी स्ट्रॅटेजी अँड इकॉनॉमिक्स : हाऊ इंडिया हॅज ट्रान्सफॉर्म्ड इन लेस दॅन डीकेड' या शीर्षकाने अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. आगामी दशकभराच्या काळात भारत हा जागतिक विकासातील पाचवा हिस्सा राहणार असल्याचा अंदाज या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे.

**वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था**

भारताबाबत विशेषत: परदेशी गुंतवणूकदारांबाबत साशंक असल्याचे म्हटले गेले आहे. भारत ही दुसऱ्या क्रमांकाची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचे गुंतवणुकदारांचे म्हणणे आहे. परंतु असे असूनही, गेल्या २५ वर्षात अव्वल कामगिरी करणाऱ्या स्टॉक मार्केटमध्ये भारताने आपल्या क्षमतेनुसार कामगिरी केलेली नाही. मात्र, असा दृष्टिकोन भारतात विशेषतः वर्ष २०१४ नंतर झालेल्या बदलांकडे दुर्लक्ष करता कामा नये असेही अहवालात नमूद करण्यात आले.

२०१४ पासून पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारल्यानंतर १० प्रमुख बदलांची यादी करताना मॉर्गन स्टॅनलीने आपल्या अहवालात म्हटले की, 'भारतातील कॉर्पोरेट कर दर इतर देशांच्या बरोबरीने आणला गेला आहे. याशिवाय पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढत आहे. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनात सातत्याने वाढ होत आहे. तसेच, सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) टक्केवारीनुसार डिजिटल व्यवहार वाढत आहेत, जे अर्थव्यवस्था सुव्यवस्थित होण्याचे लक्षण आहे, असे मॉर्गेन स्टॅनलीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारत या दशकाच्या अखेरपर्यंत जागतिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार असून जीडीपी आणि उत्पादनातील वाढ ही भारताच्या जमेची बाजू असणार असल्याचे अहवालात म्हटले आहे. भारताची निर्यात बाजारपेठेतला हिस्सा दुप्पट होणार असल्याचा अंदाज आहे. भारताचा निर्यात बाजार हिस्सा हा २०३१ पर्यंत ४.५ टक्के इतका होण्याची शक्यता आहे. वर्ष २०२१ च्या तुलनेत हे प्रमाण जवळपास दोन पट अधिक आहे. भारतात प्रति व्यक्ती उत्पन्न २२०० डॉलर प्रति वर्ष आहे. प्रति वर्ष उत्पन्न २०३२ मध्ये जवळपास ५२०० डॉलर प्रति वर्ष इतकं होणार असल्याचा अंदाज आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे घटक जोखीम पूर्ण**

मॉर्गन स्टॅनलीच्या अहवालात भारतीय अर्थव्यवस्थेवर काही घटक नकारात्मक परिणाम करणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जागतिक मंदी, २०२४ मधील लोकसभा निवडणुकीत त्रिशंकू स्थिती निर्माण होणे, कौशल्यपूर्ण मनुष्यबळ नसणे आदी घटक भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकतात, असे मॉर्गन स्टॅनलीने म्हटले.

# अजित पवारांनी उपटले नेत्यांचे कान

**सुराज्य/मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी कोल्हापूरातून आमदार हसन मुश्रीफ, माजी आमदार के. पी. पाटील तर हातकणगले मधून जिल्हा बँकेचे संचालक रणवीरसिंग गायकवाड यांचे नाव मंगळवारी मुंबईत झालेल्या पक्षाच्या उच्चस्तरीय बैठकीत पुढे आले आहे.

आगामी निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने मतदारसंघ निहाय आढावा मुंबई पक्ष कार्यालयात घेतला. आजच्या बैठकीला ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील हसन मुश्रीफ, आमदार राजेश पाटील, के. पी. पाटील, जिल्हा अध्यक्ष ए. वाय. पाटील, प्रदेश उपाध्यक्ष मानसिंगराव गायकवाड, जिल्हा बँकेचे संचालक बाबासाहेब पाटील आसुर्लेकर आदींकडून मतदारसंघ निहाय आढावा घेतला.

हातनंगले मतदारसंघासाठी जिल्हा बँकेचे



संचालक रणवीरसिंग गायकवाड यांचे एकमेव पुढे आले. ५ वेळा खासदार झालेले दिवंगत उदयसिंगराव गायकवाड यांचे ते नातू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष मानसिंगराव गायकवाड, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती शैलजादेवी गायकवाड यांचे ते सुपुत्र असल्याने त्यांना चांगले पाठबळ मिळू शकते असा चर्चेचा सूर राहिला.

**कोल्हापूरबाबत वादंग**

कोल्हापूरसाठी ठाकरे गटात असलेले माजी आमदार संजय घाटगे यांना पक्षात घेवून उमेदवारी द्यावी असे सुचवल्यावर अजित पवार यांनी इतरांची नावे सुचवून आपली जबाबदारी झटकू नका, अशा शब्दात खडसावले.

अरुण डोंगळे यांचे नाव पुढे केल्यावर ते किमान पक्षात तरी आहे का; याची तरी खात्री करा, अशा शब्दात समज दिली गेली. यापूर्वीच्या लोकसभा निवडणुकीतील संभाजीराजे छत्रपती, धनंजय महाडिक यांच्या बाबतीत सोयीस्कर राजकारण केल्याने त्यांना मते कमी पडली होती, याचीही जाणीव नेतृत्वाने करून दिली.

# पावणे दोन कोटींच्या अपहार प्रकरणी सूत व्यापारी अटकेत

**सुराज्य/कोल्हापूर**

सूत खरेदी व्यवहारात पावणे दोन कोटींचा अपहार केल्याप्रकरणी इचलकरंजीतील बडा सुत व्यापारी पंकज पुष्पक अग्रवाल व प्रवीण पुष्पक अग्रवाल या दोघांना अटक करण्यात आली आहे. याशिवाय पीयूष पंकज अग्रवाल, मयूर पंकज अग्रवाल, पुष्पक अग्रवाल व प्रीतेश शहा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गोपीकिशन हरिकिशन डागा यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे.

गोपीकिशन डागा ( ४४,रा. प्रकाश लाईट हाउस समोर इचलकरंजी) हे सूत खरेदी विक्री व्यवसाय करतात. त्यांच्या श्री हनुमान यार्न सिंडिकेट व श्रीहरी सिंटेक्स प्रायव्हेट लिमिटेड या फर्म आहेत. या फर्ममधून पीयूष टेक्स्टाईलच्या अग्रवाल कुटुंबीय सुत खरेदी करत होते. सुरुवातीच्या काळात सूत खरेदी वेळेवर देऊन फिर्यादीचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर



सूतमालाच्या बिलापोटी यांनी एनइएफटी केली असल्याचे सांगून फिर्यादीस यूटीआर नंबर पाठवला जात होता. फिर्यादी डागा यांनी बँकेत जाऊन यूटीआर नंबरची खात्री केली असता तो बोगस व बनावट असल्याचे निदर्शनास आले. अग्रवाल हे बोगस इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड तयार करत होते. त्याद्वारे त्यांनी फिर्यादीची १ कोटी ८७ लाख रकमेचा अपहार केला होता. ही थकीत रक्कम मागण्यासाठी डागा गेले असता पंकज अग्रवाल व पीयूष अग्रवाल तसेच अन्य आरोपींनी पैसे देणार नाही. काय करायचे ते कर. पुन्हा आल्यात जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. या फिर्यादीच्या आधारे दोघांना अटक करण्यात आली आहे असल्याचे पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांनी बुधवारी सांगितले.

## दोन सख्ख्या बहिणींचा नदीत बुडून मृत्यू

**सुराज्य/पुणे**

पुण्यातील आंबेगाव तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मंचरजवळ असलेल्या एकलहरे गावच्या हद्दीत घोडनदीवर कपडे धुण्यासाठी गेलेल्या दोन सख्ख्या बहिणींचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. गुरुवारी दुपारी साडेबारा वाजेच्या दरम्यान ही घडली आहे. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. आरती शाम खंडागळे (वय १८) आणि प्रीती श्याम खंडागळे (वय १७, दोघी रा. मुंबई बांद्रा) असं या बहिणींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरती आणि प्रीती या दोघी त्यांच्या मावस भावाच्या वाढदिवसासाठी १० दिवसांपूर्वी मुंबई बांद्रा येथून एकलहरे येथे आल्या होत्या. कपडे धुवत असताना कावेरीचा पाय घसरून ती पाण्यात पडली.

तिला वाचवण्यासाठी प्रीती खंडागळे आणि आरती खंडागळे या दोघी बहिणींनी नदीत उडी मारली.

# सांगलीत रोहिणीच्या पावसाचा धुमाकूळ

**सुराज्य/सांगली**


जोरदार वाऱ्यासह गुरूवारी सायंकाळी सांगलीत रोहिणीच्या पावसाने धुमाकूळ घातला. पावसाने महापालिकेच्या नालेसफाई कामाचा पंचनामा करीत वाहन चालकांची तारांबळ उडवली. अनेक ठिकाणी वाऱ्यामुळे वीज वाहक तारा तुटल्या, खांब वाकले तर रस्त्यावर पाण्याची तलाव झाले. मात्र, जिल्ह्यातील तासगाव, कवठेमहांकाळ, मिरज भागात हलका पाउस झाला. दिवसभराच्या उकाड्यानंतर झालेल्या पावसाने हवेत सुखद गारवा निर्माण झाला आहे.

गेल्या चार दिवसापासून पावसाचे वातावरण तयार होते, मात्र, पावसाची हजेरी खंडित स्वरूपात होत आहे. गुरूवारीही दिवसभर हवेतील तपमान ३९ अंशावर पोहचले असले तरी आकाशात दिवसभर ढगांचा राबता दिसत होता. सायंकाळी चार वाजलेनंतर जोरदार वारे आणि ढगांचा गडगडाट यासह दमदार पावसाने सांगली, विश्रामबाग, मिरज, कुपवाड परिसरात दमदार पावसाने हजेरी लावली.

# किल्ले रायगडाला छावणीचे स्वरूप

**सुराज्य/अलिबाग** : किल्ले रायगडावर १ जून ते ७ जून या कालावधीत ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जाणार आहे. या कालावधीत गडावर लाखो शिवभक्त आणि पर्यटक दाखल होण्याची शक्यता आहे, ही बाब लक्षात घेऊन रायगड किल्ला परिसरात तब्बल २ हजार पोलीसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सात दिवस चोविस तास हा बंदोबस्त तैनात असणार आहे. त्यामुळे किल्ले रायगडाला सध्या छावणीचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

राज्यसरकारच्यावतीने यंदाच्या शिवराज्याभिषेक सोहळा भव्यदिव्य स्वरुपात साजरा केला जाणार आहे. १ जून ते ७ जून या कालावधीत गडावर विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राजसदरेवर भव्य राजवाड्याच्या धर्तीवर मंडप उभारण्यात आला आहे. या दिवसात लाखो शिवभक्त गडावर दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गडावरील बंदोबस्त वाढविण्यात



आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, राज्यमंत्री मंडळातील अनेक मंत्री आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे या सोहळ्याला २ जूनला हजेरी लावणार आहेत. या त्यामुळे या संपूर्ण परिसराला छावणीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. २ हजार पोलीस येथे २४ तास रात्रंदिवस तैनात असणार आहेत.

## अंबानी यांच्या घरी परी अवतरली

**मुंबई** : आकाश अंबानी आणि त्याची पत्नी श्लोका दुसऱ्यांदा आई-वडील झाले आहेत. यावेळी त्यांच्या घरी परी अवतरली आहे. श्लोका यांनी मुलीला जन्म दिला आहे. दोघांना पृथ्वी आकाश अंबानी हा मुलगा असून तो अवघ्या दोन वर्षांचा आहे. एका पापाराझीने श्लोका आणि आकाशच्या दुसऱ्या बाळाची बातमी ऑनलाइन शेअर केली आहे. बाळाच्या आगमनाने संपूर्ण अंबानी कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. आकाश आणि श्लोका हे दुसऱ्यांदा माता-पिता बनले आहेत.

# मी भाजपची आहे, पण...

**सुराज्य/मुंबई**

'राष्ट्रीय समाज पक्षाने बुधवारी (३१मे) दिल्लीत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी केली. दरम्यान याच कार्यक्रमाच्या भाषणामध्ये भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे. त्या म्हणाल्या, 'मी भाजपची आहे, पण भाजप थोडाच माझा एकट्याच पक्ष आहे. महादेव जानकरांचा स्वतःचा पक्ष आहे तसा भाजप कुणी एकट्याचा नाही, ही पक्ष खूप मोठा आहे, मी त्याची एक कार्यकर्ती आहे, असं वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्या याच वक्तव्याचे आता वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ काढले जात असून, यावर राजकीय प्रतिक्रिया देखील येत आहे. पंकजा मुंडेंच्या अगोदर महादेव जानकरांचे भाषण झाले. त्यावेळी जानकर पंकजा मुंडेना भाजप हा वारंवार तुमचा पक्ष असे म्हणत होते, त्यावर भाष्य करताना पंकजा मुंडेंनी वक्तव्य केले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंकजा मुंडे यांच्या वक्तव्याचा विपर्यास केल्याचं म्हटलं आहे. पंकजाताई भाजप माझ्या पाठिशी आहे, असंच म्हणाल्या', असं बावनकुळे म्हणाले.



कुस्तीपटूंचं दिल्लीत सुरु असलेल्या आंदोलनावरून भाजप खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनी स्वतःच्याच पक्षाला घरचा आहेर दिला असतानाच, आता पंकजा मुंडेंच्या एका वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

दिल्लीत आयोजित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे की, 'मी भाजपची आहे, पण भाजप ही पार्टी माझी थोडीच आहे. मला भीती वाटत नाही. कशाचीच भीती वाटत नाही. भीती न वाटणं हे आमच्या रक्तातच आहे. कशाची चिंता नाही. काही नाही मिळालं तर मी ऊस तोडायला जाईल. आम्हाला काही गमवायचंच नाही. आम्हाला आयुष्यात कोणत्याही गोष्टींची आस्था, अपेक्षा आणि लालसा नाही, असं पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. तर त्यांच्या याच वक्तव्यावरून आता चर्चांना उधाण आले आहे.'

# मुंडेंच्या विधानाचा विपर्यास

'मी भाजपची आहे, पण भाजप पक्ष थोडीच माझा आहे', असं वक्तव्य भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी केल्यानंतर चर्चांना उधाण आलं. त्यानंतर आता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंकजा मुंडे यांच्या वक्तव्याचा विपर्यास केल्याचं म्हटलं आहे. पंकजाताई भाजप माझ्या पाठिशी आहे, असंच म्हणाल्या, असं बावनकुळे म्हणाले.



दिल्लीत आयोजित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, 'मी भाजपची आहे, पण भाजप ही पार्टी माझी थोडीच आहे. मला भीती वाटत नाही. कशाचीच भीती वाटत नाही. भीती न वाटणं हे आमच्या रक्तातच आहे. कशाची चिंता नाही. काही नाही मिळालं तर मी ऊस तोडायला जाईन. आम्हाला काही गमवायचंच नाही.

आम्हाला आयुष्यात कोणत्याही गोष्टींची आस्था, अपेक्षा आणि लालसा नाही. त्यांच्या याच वक्तव्यावरुन विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, 'पंकजा मुंडे यांच्या वक्तव्याचा संपूर्ण विपर्यास आहे. मी त्यांचं संपूर्ण भाषण ऐकलेलं आहे. पंकजाताई यांनी भाजपबद्दल बोलताना पक्ष माझ्या पाठीशी आहे असे वक्तव्य केले आहे. पंकजाताई भाजपच्या नेत्या आहेत. त्यांच्या बोलण्याचा नेहमीच विपर्यास केला जातो. पंकजाताई ज्या पद्धतीने महाराष्ट्रात फिरत आहेत, पक्षाच्या जनसंपर्क अभियानात त्या सहभागी झाल्या आहेत. मध्यप्रदेशात त्यांच्या अनेक सभा होत आहेत. त्यामुळे कोणत्याही विषयाला धरुन त्यांच्याबद्दल महाराष्ट्रात संभ्रम निर्माण करणे चूक आहे. मी आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी नेहमी बोलत असतो. त्या थोडंही बोलल्या तर त्याचा विपर्यास केला जातो असं मला वाटतं.'

**आमचा पक्ष महासागर**

भाजप मधील इनकमिंगविषयी बोलताना आमचा पक्ष महासागर असल्याचं बावनकुळे म्हणाले. आमचा पक्ष महासागर आहे, अरबी समुद्रासारखा आहे. या महासागरामध्ये कितीही लहान, कितीही मोठा, कोणत्याही पक्षातला नेतृत्व आला तरी आमच्याकडे खूप स्पेस आहे.



## नारी शक्तीचा सन्मान हाच देशाचा अभिमान : पाटील

**अक्कलकोट** : नारी शक्तीचा सन्मान हाच देशाचा अभिमान असल्याचे प्रतिपादन चपळगाव चे विद्यमान सरपंच उमेश पाटील यांनी व्यक्त केले. चपळगाव ग्रामपंचायत कार्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता, यामुळे कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात सरपंच उमेश पाटील बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच बसवराज बाणेगांव, सामाजिक नेते सिध्दाराम भंडारकवठे,व ग्रामपंचायत सर्व सदस्य उपस्थित होते. सुरूवातील अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन अंदपा बंडगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैजयंतीमाला गायकवाड, सुरेखा बिराजदार व श्रीदेवी चाबुकस्वार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुरेखा बिराजदार यांनी आपले मनोगत मांडले. त्यावेळी ज्ञानेश्वर कदम, सुरेश सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर वाले, श्रावण गजधाने, गणेश कोळी,विलास कांबळे, महिबुब तांबोळी, पोलिस पाटील चिदानंद हिरेमठ, ग्रामविकास अधिकारी सोमनिंग कणगी, प्रकाश बुगडे यांच्या सह अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर्स व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन ज्ञानेश्वर कदम यांनी केले. आभार सुरेश सुरवसे यांनी मांडले.



## दरवाढीसाठी महामार्गावर शेतकऱ्यांचे आंदोलन

**सोलापूर** : खासगी आणि सहकारी दूध संघाच्या दूध दर कपातीच्या निषेधार्थ कोंडी ता. उत्तर सोलापूर येथील शेतकऱ्यांनी बुधवारी सकाळी सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दूध सांडून आंदोलन केले. राज्य सरकारने दूध संघांवर कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. खासगी आणि सहकारी दूध संघांनी दूर खरेदी दरात २ ते ३ रुपयांची कपात केली आहे. कोंडी येथील दूध उत्पादक शेतकरी पांडुरंग जाधव, अमोल साठे, प्रफुल्ल कदम, दीपक कदम, तुकाराम ननवरे यांच्यासह अनेक शेतकरी राष्ट्रीय महामार्गावर जमले. तीन कॅनमधील दूध रस्त्यावर ओतून निदर्शने केली. पांडुरंग जाधव म्हणाले, खासगी आणि सहकारी संस्थांनी संगनमताने दुधाचे दर कमी केले आहेत. ही शेतकऱ्यांची लूट आहे. पशुखाद्याची दरवाढ होत आहे. केवळ दूध खरेदी दर कमी करुन लूट सुरू आहे. भाजप आणि शिंदे सरकारने यात लक्ष घालावे.

## जर्मनीतील तिकीट प्रदर्शनात सोलापूरचे किशोर चंडक सन्मानित

### विश्वातील 'लार्ज गोल्ड' पुरस्कार प्रदान

**सोलापूर** : भारतामध्ये पोस्टाचा सन १८५२ मध्ये पहिले तिकिट निघाले परंतु पत्र ज्या गावात पोहोचले त्या गावात शिक्का मारला जात असे या पहिल्या शिक्याचा सखोल अभ्यास करणारे सोलापूरचे उद्योजक किशोर चंडक यांना जर्मनीतील तिकिट प्रदर्शनात लार्ज गोल्ड या विश्वातील अतिउच्च पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. भारतामध्ये पहिले तिकिट निघाले १८५२ साली. त्याआधी भारतातदेखील पत्रव्यवहार सुरुच होते आणि




या पत्रावर ज्या गावावरुन पत्र निघाले, ज्या गावात पत्र पोचलं, त्या गावात शिक्के मारले जात. अस्तित्वात असलेला आणि माहित असलेला पहिला शिक्का भारतामध्ये १७७४ साली वापरला गेला तर १७७४ पासून भारतातील पहिलं तिकिट निघेपर्यंत म्हणजेच १८५२ पर्यंत अशा प्रकारच्या पत्राच्या देवाणघेवाणावर जे पोस्टाने शिक्के मारले त्या शिक्यांचा अभ्यास करून त्याचा एक उत्कृष्ट असा संग्रह सोलापूरचे उद्योजक किशोर चंडक यांनी जर्मनीमध्ये ठेवला होता. या प्रदर्शनामध्ये संपुर्ण जगातून २ हजार ८०० लोकांपेक्षाही जास्त लोकांनी सहभाग घेतला होता. आणि प्रदर्शनात जर्मनीमध्य किशोर चंडक यांच्या संग्रहाला तिकिट प्रदर्शनात 'लार्ज गोल्ड मेडल' या सर्वोच्च पदक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. किशोर चंडक यांनी या प्रदर्शनात ठेवलेली पाकिटं ही निश्चितच अतिशय दुर्मिळ तर आहेतच परंतु अशी अनेक पाकिटे आणि ज्यावरचे शिक्के आहेत की जे संपुर्ण जगात एकमेवाद्वितीय आहेत आणि या सगळ्या शिक्यामध्ये सोलापूरमध्ये १८३६ साली वापरलेला शिक्का देखील असाच दुर्मिळ आहे जो एकच जगामध्ये उपलब्ध आहे तो देखील त्या प्रदर्शनात ठेवण्यात आला होता.

# अहो, मास्तर जरा महेशकडे लक्ष द्या : जयंत पाटील

## शहर उत्तर आणि मध्य विधानसभेसाठी केली शिष्टाई

**सुराज्य/सोलापूर**

**गुरुवारी सकाळी ११.३० ची वेळ..., राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची गाडी दत्तनगर येथील माकपचे माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांच्या निवासस्थानासमोर थांबली. लागलीच आडम मास्तर यांनी जयंत पाटील व त्यांच्यासोबत असलेले माजी महापौर महेश कोठे, माजी आमदार दीपक साळुंखे यांचे स्वागत केले. पाटील यांनी मास्तरांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले व त्यांच्या आत्मचरित्र पुस्तक प्रकाशनास शुभेच्छा दिल्या. त्यानिमित्ताने जयंत पाटील यांनी अहो, मास्तर आमच्या महेश कोठेकडे जरा लक्ष द्या. अशी विनंती करताच मास्तरांनी शहर उत्तरमध्ये माझे १० हजार सभासद मतदार आहेत, तुम्ही काळजी करु नका. फक्त त्यांना तिकडे (शहर मध्य) फिरकू देऊ नका असे सांगून कोठे यांचा व स्वत:चा ही मार्ग मोकळा करुन घेतला.**



राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील गुरुवारी सोलापूर दौऱ्यावर होते यावेळी त्यांनी दिवसभरात माजी आमदार दिलीप माने यांचे चिरंजीव पृथ्वीराज माने यांच्या विवाहाला उपस्थिती दर्शवली. सकाळी माजी महापौर महेश कोठे यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. तसेच माजी आमदार नरसय्या आडम यांच्या निवासस्थानी जाऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. जयंत पाटील यांचा सोलापूर दौरा हा राजकीय दृष्ट्या महत्त्व आहे राष्ट्रवादी काँग्रेसने कोणत्याही परिस्थितीत महापालिका जिंकण्याचा इरादा स्पष्ट केला आहे यासाठी त्यांनी माजी महापौर महेश कोठे यांच्याकडे पक्षाची धुरा सोपवली आहे.

दुसरीकडे माजी आमदार दिलीप माने हे ही राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत. एकीकडे दिग्गज नेत्यांना पक्षात घेताना दुसरीकडे राष्ट्रवादी मित्रपक्षही जोडण्याचा प्रयत्न करत आहेत. मध्यंतरी राष्ट्रवादीने भाजपला पराभूत करण्यासाठी सर्व पक्षांनी एकत्र यावे, असे आवाहन केले होते. त्याला माकपचे माजी आमदार आडम यांनी संमती दर्शवली होती. अनेकवेळा माजी आमदार आडम यांनी आपण महापालिकेत भाजपला पराभूत करण्यासाठी राष्ट्रवादीसोबत जाऊ असे वक्तव्य केले होते. तोच धागा पकडत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे आडम मास्तर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी पोहोचले.

यावेळी त्यांच्यासोबत माजी महापौर महेश कोठेही उपस्थित होते. वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन औपचारिक गप्पा झाल्यावर जयंत पाटील यांनी आडम मास्तर यांना जरा आमच्या महेशकडे लक्ष द्यावे अशी विनंती केली. त्यावर मास्तर यांनी महेश कोठे यांना उत्तर कडे लक्ष देण्याचा सल्ला दिला तर मध्य मी तयारच आहे असे सांगितले.

वास्तविक पाहता महेश कोठे राष्ट्रवादी पक्षाकडून शहर मध्य मधून लढण्याची तयार तयारी करत आहेत. शहर उत्तरमध्ये मास्तर यांनाही मानणारा मोठा वर्ग आहे त्यांची मदत झाल्यास महेश कोठे यांचा मार्ग सोपा होईल असे बोलले जात आहे तर दुसरीकडे सध्या शहर मध्य मध्ये राष्ट्रवादी आडम यांना पाठिंबा देऊ शकते.

या भागात कोठे यांचे वर्चस्व चांगले आहे. त्यामुळे दोन पद्मशाली आमदार निवडून येण्याची शक्यता असल्याचे गणित राष्ट्रवादकडून सध्या बांधले जात आहे. त्यामुळे जयंत पाटील यांनी कोठे आणि मास्तर यांना एकत्र आणत शहर उत्तर आणि मध्य विधानसभा मतदारसंघासाठी शिष्टाई केली का अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### कोठे तुम्ही आमच्याकडे येऊ नका : आडम

महेश कोठे यांच्याकडून शूभेच्छा घेताना मास्तरांनी आमच्या घरकुल योजनेचे शहर उत्तर मतदारसंघात दहा हजार सभासद आहेत लक्षात ठेवा, आम्ही निवडून आणतो तुम्हाला, येऊ नका आमच्याकडे (शहर मध्य). असे म्हणताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

## बोलेरोमधील ५०० लिटर हातभट्टी जप्त

**सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने बुधवारी रात्री तिर्हे (ता.उत्तर सोलापूर) येथे एका बोलेरोमधून वाहतूक होणारी पाचशे लिटर हातभट्टी दारु जप्त केली. MH-13-Q-0197 या वाहनातून पाच रबरी ट्युबमध्ये अंदाजे १०० लिटरप्रमाणे ५०० लिटर हातभट्टी दारु वाहतूक होतांना आढळून आली. वाहनचालक विश्वनाथ दत्तात्रय जाधव (वय ३५ रा. मुळेगाव ता.दक्षिण सोलापूर) याला अटक करून दारुबंदी कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. वाहनासह ४ लाख २५ हजाराचा माल जप्त करण्यात आले.

# कारहुणवी सणानिमित्त तालुक्यातील बाजारपेठा सजल्या

▶ सर्जा-राजांचा होणार सन्मान

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट तालुक्यातील सीमावर्ती भागात दरवर्षीप्रमाणे यंदा ही कारहुण्वी सणाच्या निमित्ताने अक्कलकोट शहर व ग्रामीण भागातील सर्वच दुकाने बैलांच्या साहित्याने सजली आहेत.सिमावर्ती भागात साजरा होणारा कारहुणवी सणाला या भागात विशेष महत्व असते.वर्षभर उन्हातान्हात राबणाऱ्या आपल्या सर्जा-राजांना सन्मान देण्याचा दिवस म्हणून शेतकरी उत्साहाने हा कारहुण्वी सण साजरा केला जातो.

दरवर्षी शेतकरी उसनवारी करुन अथवा अन्य शेतकर्यांच्या शेतात भाड्याने मशागत करुन आलेल्या पैशातून बैलांना साद-शृगांर घालतात.परंतु गतवर्षी तालुक्यात झालेल्या समाधानकारक



पाऊसामुळे यंदा शेतकर्यात समाधान दिसून येते.कारण सध्या कडक उन्हाळयात ही तालुक्यात सर्वत्र बागायत पिके पहायला मिळतात.वरुणराजाच्या कृपादृष्टीमुळेच यंदा तालुक्यातील शेतकर्यात समाधानाचे वातावरण दिसते. बैलांच्या व अन्य पशूंच्या साद-शृगांर साहित्याने सध्या बाजारपेठ सजली गेली आहे.तालुक्याच्या सीमावर्ती भागात बहुसंख्य गावात कारहुणवी सण साजरा केला जातो.काही ठिकाणी बैलपोळा म्हणुन ही हा सण साजरा केला जातो.तर कर्नाटकात मात्र बेंदुर म्हणून हा सण साजरा केला जातो.वर्षभर कष्टाची कामे करणार्या आपल्या सर्जा-राजांना आणि इतर पशूंना या कारहुण्वी सणाच्या दिवशी अंघोळ घालून विशेष पूजा करून बैलांना गोडधोड खाऊ घातली जाते.या दिवशी बैलांना रंगरंगोटी करुन, अंगावर झूल घालून गोड पक्वान्न खाऊ घालून सायंकाळी गावाच्या प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात येते.

यादिवशी बैलांना सजवण्यासाठी शेतकर्यामध्ये जणू स्पर्धाच लागल्याचे चित्र सर्वत्र पहायला मिळते. वर्षातून एकदा येणारा हा बैलांचा सण म्हणून या सणाची हौस पूर्ण करण्यासाठी शेतकरी बराच मेहनत घेत असतो. बाजारपेठेतून बैलांसाठी विविध साहित्य खरेदी करुन बैलांना आकर्षक रंगाने सजविले जाते.तालुक्यात विशेष करुन गेल्या दोन वर्षांपासून समाधान कारक पाऊस झाल्याने यंदा बैलांचे साहित्य खरेदी करताना बळीराजाच्या चेहऱ्यावर उत्साहा दिसून येत आहे.परंतु सध्या शेतकरी यांत्रिक शेतीला प्राधान्य देत असल्याने तालुक्यातील बैलांची संख्या मात्र दिवसेंदिवस घटत असल्याची चित्र पहायला मिळत आहे.वरुणराजाच्या कृपादृष्टींमुळे यंदा तालुक्यातील शेतकर्यात समाधानाचे वातावरण दिसते.याच उत्साहात यंदा कारहुण्वी सण जल्लोषात साजरा होणार असल्याचे ही बोलले जात आहे.या सणाचे औचित्य साधून शेतकरी बैलांचा ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक ही काढली जाते. शेवटी गावातील सर्व बैलजोडयांची शर्यत, मिरवणूक आणि फटाक्यांच्या आतिषबाजी करीत कारहुण्वी सणाची सांगता करण्यात येते.

# विडी कामगाराच्या घरकुलातून आईच्या वचनाची पूर्तता : आडम

**सुराज्य/सोलापूर**

मृत्युशय्येवर असताना आईने विडी कामगारांना घर मिळवून देण्याचे वचन घेतले होते. त्या वचनाची पूर्तता केली हे माझ्यासाठी भाग्याचे आहे. यापुढेही कामागारांसाठी आयुष्यभर लढा देईन असे प्रतिपादन माजी आ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केले. आज पंतप्रधान मोदींकडून बाबासाहेबांची घटना बदलण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र हीच घटना आता त्यांचा पराभव केल्याशिवाय राहणार नाही, असे आडम मास्तर म्हणाले.

माजी आ. नरसय्या आडम यांच्या जीवनावर लिहिण्यात आलेल्या 'संघर्षाची मशाल हाती' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा थाटात पार पडला, त्यावेळी आडम सत्काराला उत्तर देताना बोलत होते. सुरूवाती पुस्तकाचे प्रकाशन माकपचे ज्येष्ठ नेते, माजी खा. सीताराम येचुरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माकपचे पॉलिट बिरो सदस्य डॉ. अशोक ढवळे, महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. उदय नारकर




, ॲड. एम.एच. शेख, कामिनी आडम, नलिनी कलबुर्गी, सुहास कुलकर्णी, युसुफ मेजर, सनी शेट्टी ॲड. अनिल वासम, आदी व्यासपिठापर उपस्थित होते.

मास्तर पुढे म्हणाले, लहानपणी गरीब परिस्थिती होती. एका महत्वाच्या कामासाठी गावाला एसटीने जाता आले नाही तेव्हा मी ठरवले होते की एसटीच काय एक दिवस मी विमानात बसेन. मी १९७८ साली प्रथम आमदार झालो मुंबईवरून नागपूरला विमानाने गेलो आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी असंघटित कामगारांसाठी काम करत आहे. आज ४१ हजार ६०० लोकांना आपण घर मिळवून दिली.

यात आनंद आहे. यासाठी स्वपक्षीयांसह विरोधी पक्षातील लोकांचेही सहकार्य मिळाले. त्यावरून कळाले की कामगारांसाठी जो झटतो, त्याला कोणत्याही अडचणी येत नाहीत, सर्वजण त्याला मदत करता. त्यामुळे आगामी काळातही आपण कामगारांसाठी कायम झटत राहणार.

### मास्तरांची आत्मकथा प्रेरणा देणारी : येचुरी

आडम मास्तर यांचे जीवन संघर्षमय राहिले आहे. त्यांनी आपल्या जीवनात पाहिलेले चढ-उतार आत्मकथेत उतरवले आहेत. त्यांची आत्मकथा अनेकांना प्रेरणा देणारी आहे. याशिवाय नवीन पिढीलाही या आत्मकथेतून संघर्ष कसा करायचा हे शिकण्यासाठी मिळणार आह. आडम मास्तर यांच्यापुढे आणखीन लढाया आहेत ते यापुढेही निश्चित न झुकता त्या लढाया लढतील आणि निश्चित जिंकतील, असा विश्वास माजी खासदार सिताराम ये चोरी यांनी व्यक्त करत आराम मास्तर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

▶▶ कामगारांसाठी लढा चालूच ठेवण्याचा मानस ▶▶ 'संघर्षाची मशाल हाती'चे थाटात प्रकाशन ▶▶ मान्यवरांकडून आडम यांच्या संघर्षमय जीवनाचे कौतूक

### २५ लाखही घेतले नाही आणि मंत्रिपदही नाही

वसंतदादा पाटील यांच्या सरकारविरोधात बंडखोरी करून ज्येष्ठ नेते शरद पवार मुख्यमंत्री झाले. त्यानंतर वसंतदादांनी नागपूर अधिवेशनावेळी दिग्गज नेत्यांसोबत माजी आमदार निवासात भेट घेतली आणि पवार यांच्याविरोधात भूमिका घेण्यासाठी मला आग्रह केला. रोख २५ लाख रुपये आणि विधान परिषदेचे सदस्यत्व देण्याचे आमिषही दाखविले. वसंतदादांचा तो प्रस्ताव मी धुडकावला. ही माहिती मिळताच पवार यांनी मला मंत्रिपदाची ऑफर दिली होती. मात्र, ती ऑफर मी नम्रमपणे नाकारली, असे आडम यांनी भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक एम. एच. शेख यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनिल वासम यांनी केले. यावेळी डॉ. ढवळे, डॉ. नारकर यांनीही आडम यांच्या संघर्षयम जिवनाचे कौतूक केले.

### कार्यकर्त्यांनी घातले मास्तरांचे मुखवटे

कॉ.मुरलीधर सुंचू यांच्या नेतृत्वाखाली खाली काढण्यात आलेल्या स्वागत रॅलीत कार्यकर्त्यांनी मास्तरांचा मुखवटा धारण करून त्यांच्या प्रति प्रेम व्यक्त करत अनोख्य शुभेच्छा दिल्या. हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. याची सर्वत्र चर्चा होत होती.

# देश वाचवण्यासाठी धर्मनिरपेक्ष पक्षाने एकत्रित यावे

## माजी खासदार येचुरी यांचे आवाहन

**सुराज्य/सोलापूर**

नव्या संसदेच्या इमारतीचे उद्घाटन करून पंतप्रधान मोदी यांनी प्रजासत्ताक देशात प्रथमच राज्याभिषेक सोहळा पूर्ण करून घेतला आहे. नव्या इमारती पेक्षा देशात सामाजिक सलोखा यावर भाष्य करणे अपेक्षित आहे.पण ते होताना दिसत नाह. आदानी यांना पोसण्यात मोदी सरकारचा वेळ चालला आहे. आगामी काळात देशाला आणि देशाच्या लोकशाहीला वाचवण्यासाठी धर्मनिरपेक्ष पक्षाने एकत्रित येण्याची गरज आहे. तसे प्रयत्न विरोधकांकडून केले जात आहेत, असे प्रतिपादन माकपचे माजी खासदार सीताराम येचुरी यांनी केले.

सोलापूर दौऱ्यावर आले असता शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. येचुरी म्हणाले की, आज देशाची अवस्था खराब झाली आहे. सर्वत्र महागाई आणि बेरोजगारी वाढत आहे. याची सरकारला कोणतीही चिंता नाही. पैलवानांवर अत्याचार होत आहेत, मणिपूरमध्ये हिंसाचार वाढत आहेत. मात्र सरकार पार्लमेंटचे उद्घाटन करण्यात व्यस्त



आहे. वास्तविक पाहता संसद भवनची इमारत नवीन नाही तर मजबूत असणे आवश्यक आह. नवीन संसद भवनाचे उद्घाटन करताना कोणालाही विश्वासात घेतले नाही, कोणतेही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. हे उद्घाटन म्हणजे मोदी यांचा राज्याभिषेकच होता. २०२२ मध्ये संसदेत केवळ ५६ दिवस कामकाज चाचले चालले तर मनमोहन सिंग यांच्या काळात २०० पेक्षा जास्त दिवस संसदेचे कामकाज चालू होते. यावरून भाजपला लोकांची किती चिंता आहे हे कळून येते. आज संसदेत ५० लाख कोटींचे बजेट केवळ पाच मिनिटात मंजूर करण्यात येते हे दुर्दैव आहे. भाजपाकडून संविधान पायदळी तुडवले जात आहे. आगामी काळात लोकशाही वाचवण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येणे आवश्यक आहे. राज्यात ज्यांची ताकद आहे तेथे त्या पक्षांनी पुढाकार घेतला पाहिजे. लवकरच बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली विरोधी पक्षांची बैठक होणार आहे यापुढेही अशा अनेक बैठका होणार आहेत. संविधान वाचवण्यासाठी सर्व पक्षांनी आज एकत्र येणे गरजेचेच असल्याचे माजी खासदार येचुरी म्हणाले.

**चौकशी मागे लावून विरोधकांना गप्प करण्याचे प्रयत्न** : केंद्र सरकारकडून सहकारी संस्थांचा गैरवापर होत आहे. अनेक नेत्यांच्या मागे ईडी, सीबीआय चौकशी लावून त्यांना गप्प करण्याचे प्रयत्न होत आहेत. सहकारी संस्थांचा असा वापर यापूर्वी कोणत्याही सरकारच्या काळात झाला नव्हत. जे नेते भाजपमध्ये गेले आहेत त्यांच्या मागच्या चौकशी बंद करण्यात आल्या आहेत असेही येचुरी म्हणाले

**समोरची आव्हाने काय आहेत हे पाहून मतदान करा** : देशभरामध्ये जातीपातीचे राजकारण करून सांप्रदायिक आणि ध्रुवीकरणाच्या नावाखाली हिंदू व्होट बँक मजबूत करण्याचा डाव आखला जात आह. आज भाजप विरहीत व्होट बँक तयार करण्याची गरज आह. मोदींचा चेहरा बघून लोक मतदान करत आहेत, हे अत्यंत चुकीचे आहे.सध्याच्या परिस्थितीमध्ये आपल्या समोरची नेमकी कोणती आव्हाने आहेत हे पाहून जनतेने विचार केला पाहिजे, असेही येचुरी यांनी यावेळी बोलताना सांगितले

# महापालिकेतील १४४ अधिकारी व कर्मचारी झाले निवृत्त

## निवृत्ती सत्कार सोहळ्यात भारावले कर्मचारी

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर महापालिकेतील एकूण १४४ अधिकारी व कर्मचारी निवृत्त झाले. निवृत्ती सत्कार सोहळ्यात कर्मचारी भारावून गेल्याचे दिसून आले.

साधारणता एक जून पूर्वी म्हणजेच ३१ मे रोजी मोठ्या संख्येने कर्मचारी व अधिकारी निवृत्त होतात. सोलापूर महापालिका प्रशासनातील विविध विभागातील एकूण १४४ कर्मचारी व अधिकारी दि. ३१ मे २०२३ रोजी निवृत्त झाले आहेत. प्रदीर्घ सेवेनंतर हे कर्मचारी निवृत्त झाले आहेत. यामध्ये वर्ग- १ श्रेणीतील



१ अधिकारी, वर्ग - २ मधील १ अधिकारी, वर्ग - ३ मधील २४ कर्मचारी तर वर्ग - ४ मधील ११८ कर्मचारी असे एकूण १४४ अधिकारी व कर्मचारी हे निवृत्त झाले आहेत. दरम्यान सोलापूर महापालिकेतील या निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ त्याच्या विभागाच्या कामाच्या ठिकाणी पार पडला. वरिष्ठ अधिकारी, कामगार नेते, कामगार संघटनांचे प्रतिनिधी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी संबंधित निवृत्त कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या प्रदीर्घ सेवेतील कामाच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. निवृत्त कर्मचारी हे भारावून गेल्याचे दिसून आले.